RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड . सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. 18 एप्रिल 2026**



1918- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणासाठी मदत करणाऱ्या सयाजीराव गायकवाड महाराजांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्यक्ष भेट घेतली.
1938- डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजकोटचे राजे साहेब ठाकुर यांची भेट.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

शनिवार, १८ एप्रिल २०२६ | वर्ष : ६ | अंक : १०८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, 18 April 2026 | Year : 6 | Issue : 108 | Daily | Rate: Rs. 5/-

# एससी, एसटी आणि ओबीसींचे अधिकार हिसकावून घेण्याचा हा अजेंडा : राहुल गांधी

**नवी दिल्ली :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, 'हे सरकार घाबरलेले आहे. असे काम सरकारने यापूर्वी जम्मू काश्मीर आणि आसाममध्ये केले आहे. आता सरकार ते पूर्ण देशामध्ये करू इच्छित आहे.' लोकसभेत बोलतांना विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, 'हे विधेयक देशाचा राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे. हे विधेयक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी प्रवर्गांच्या विरोधात आहे. त्यांचे अधिकार हिसकावून घेण्याचा हा अजेंडा आहे', असा आरोप राहुल गांधींनी केला. 'या विधेयकाचा महिलांच्या सशक्तीकरणाशी कोणताही संबंध नाही. तुम्ही पुन्हा सत्ता बळकावण्याच्या प्रयत्नामध्ये आहात. हे विधेयक देशविरोधी आहे. आम्ही सरकारला असे करू देणार नाही. दक्षिण आणि उत्तर भारतासोबत भेदभाव केला जात आहे. मागास प्रवर्ग आणि आदिवासींचा सहभाग करण्याचे हे प्रयत्न आहेत', असेही राहुल गांधी लोकसभेत बोलताना म्हणाले.

**राहुल गांधींनी त्यांचा आजीसोबतचा (इंदिरा गांधी) एक प्रसंग सांगितला.** 'मी लहान असताना मला कुत्र्यांची भीती वाटायची. एकदा मला आजी अंधार असलेल्या बागेत घेऊन गेली. तिथे मला दोन-तीन मिनिटं उभे केले. त्यावेळी मी प्रचंड घाबरून गेलो होतो. नंतर माझ्या आजी मला येऊ सांगितले. तुझ्या मनात ज्या गोष्टींची भीती वाटत होती. ती तुझ्या डोक्यात होती, असे सांगत राहुल गांधी म्हणाले, असेच हे सरकार घाबरलेले आहे. या सरकारला अंधारात जायचे नाही, म्हणजे हे सरकार अडचणींपासून वाचण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्हाला जर उत्तर हवे असेल तर तुम्हाला समस्यांना सामोरे जावे लागेल.

### कोडं 16 आकड्यात ...



संसदेत महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरून वादळी चर्चा सुरु आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विधेयकांवर बोलताना सरकारच्या उद्देशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गांधी यांनी संसदेतील भाषणाचा शेवट करतांना 16 या आकड्याचा उल्लेख करून अनेकांना कोड्यात टाकले आहे. गांधी यांनी टाकलेल्या या कोड्याचा अर्थ लावण्याचा अनेकजण प्रयत्न करत आहेत. गांधी यांच्या 16 या आकड्याचा अर्थ टीडीपीचे 16 खासदार असा होतो की, 16 मिनिटांचा वादग्रस्त स्कँडलचा समोर आलेला व्हिडीओ याचा तो संदर्भ आहे का? याबाबत आता तर्क वितर्क लावले जात आहे. राहुल गांधी यांनी देखील याप्रकरणी भाष्य करतांना हे कोडं ज्यांना उलघडलं त्यांनी एक्सवर (पूर्वीचे ट्विटर) पोस्ट करावे, असेही सूचवले.
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल लोकसभेत बोलत होते, त्यावेळी पाहत होतो. कमी एनर्जीमध्ये प्रधानमंत्री बोलत होते. यानंतर माझ्या लक्षात आले की तो दिवस 16 एप्रिल आहे, ते संवाद साधू शकले नाहीत, कारण हे विधेयक मंजूर करण्याचा प्रयत्न म्हणजे एक चूक होती हे त्यांना स्पष्ट होते. ते मंजूर होणार नाही हे सर्वांनाच माहीत होते आणि त्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली होती, राहुल गांधी यांनी या क्षणाचे साक्षात्कार असा उल्लेख केला.

### राहुल गांधींच्या भाषणातील मुद्दे...

1) लोकसभेत बोलतांना राहुल गांधींची सुरुवात हलक्या फुलक्या भाषेने केली. ते म्हणाले, आपण सगळेच आपल्या आयुष्यातील कुठल्या ना कुठल्या महिलेमुळे प्रभावित होत मोठे झालो आहोत. कुटुंब, समाज आणि देशाला पुढे नेण्यात महिलांचा वाटा निर्णायक राहिलेला आहे. पण, मला आणि पंतप्रधानांना पत्नी नाही, असे म्हणताच सभागृहात हास्यकल्लोळ झाला.
2) या विधेयकाचा महिलांच्या सशक्तीकरणाशी कोणताही संबंध नाही. तुम्ही पुन्हा सत्ता बळकावण्याच्या प्रयत्नामध्ये आहात. हे विधेयक देशविरोधी आहे. आम्ही सरकारला असे करू देणार नाही. दक्षिण आणि उत्तर भारतासोबत भेदभाव केला जात आहे. मागास प्रवर्ग आणि आदिवासींचा सहभाग कमी करण्याचे हे प्रयत्न आहेत.
3) माझ्या बहिणीने ते करून दाखवले आहे, जे मला 20 वर्षांमध्ये करता आलेले नाही. काल तिने गृहमंत्री अमित शाह यांना हसवले. माझ्या बहिणीची भाषणाची शैली मला आवडते. तिची शैली माझ्यापेक्षा वेगळीच आहे.
4) हे महिला आरक्षण विधेयकच नाहीये. महिला आरक्षण विधेयक 2023 मध्येच मंजूर झालेले आहे. हे विधेयक देशाचा राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे. हे विधेयक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी प्रवर्गांच्या विरोधात आहे. त्यांचे अधिकार हिसकावून घेण्याचा हा अजेंडा आहे.
5) देशाच्या राजकारणात काय घडतं आहे, हे बघून तुम्ही घाबरत आहात. तुमची शक्ती कमी होत चालली आहे. त्यामुळे राजकीय नकाशा बदलण्याची प्रयत्न करत आहात. हे आसाममध्ये केलं, पण आता आम्ही असे करू देणार नाही. संपूर्ण विरोधी विरोधी पक्ष हे हाणून पाडणार.
6) आम्ही ओबीसींचे हक्क हिसकावू देणार नाही. तुम्ही त्यांना हिंदू म्हणता, पण त्यांना या देशात त्यांचे हक्क देत नाही. हे सत्य तुम्हाला सहन होत नाही. उद्योगांमध्ये, व्यवसायात, खासगी क्षेत्रात, न्याय व्यवस्थेत मागास प्रवर्ग कुठे आहे? तुम्ही ओबीसी आणि दलित यांना हिंदू म्हणता मात्र त्यांना या कुठेही स्थान देत नाही.
7) काल पंतप्रधान मोदींचे भाषण मी बघितले. त्यांच्या बोलण्यात अजिबात शक्ती नव्हती. त्यांचे बोलणे प्रभावी नव्हते. काल 16 एप्रिल तारीख होती. तुमच्या अडचणींचे उत्तर 16 आहे. सगळे विरोधक मिळून सरकारचे हे प्रयत्न हाणून पाडणार आहेत.
8) भारतीय महिलांच्या पाठीमागे लपून सरकार देशाचे निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न करत आहे. हे लज्जास्पद आहे, कारण हे सगळे भारतीय महिलांच्या नावावर केले जात आहे...

## प्रधानटमंत्री आणि माझ्यात पत्नीचा कोणताही मुद्दा नाही. : राहुल गांधी

नवी दिल्ली : महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना या विषयावरील लोकसभेच्या विशेष अधिवेशनादरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी हलक्याफुलक्या अंदाजात बोलले. ते म्हणाले, 'माझा आणि प्रधानमंत्रींचा'पत्नीचा प्रश्न नाही,' ज्यामुळे सभागृहात हास्यकल्लोळ झाला.
त्यानंतर, गंभीर सूर लावत राहुल गांधींनी महिलांच्या भूमिकेवर भर दिला. ते म्हणाले की, महिला या राष्ट्राच्या सामूहिक विचार आणि कल्पनाशक्तीची एक महत्त्वाची प्रेरक शक्ती आहेत. ते असेही म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयुष्यात, मग ते कौटुंबिक, सामाजिक किंवा सार्वजनिक जीवनात असो, महिलांकडून खूप काही शिकले आहे.
राहुल गांधी पुढे म्हणाले की, मतदारसंघ पुनर्रचनेमुळे महिलांना सक्षम करता येणार नाही. ते म्हणाले, 'जुने विधेयक आणा, आम्ही ते मंजूर करू.' चर्चेदरम्यान राहुल गांधी म्हणाले की, सरकारला देशातील ओबीसी बांधवांना सक्षम करायचे नाही; हा एससी आणि एसटींचे हक्क काढून घेण्याचा प्रयत्न आहे. ते म्हणाले की, हे विधेयक देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे; यासाठी भारतीय महिलांचा वापर आणि शोषण केले जात आहे.
आपल्या भाषणात राहुल गांधी म्हणाले की, पुढील 15 वर्षांसाठी जात जनगणनेचा प्रतिनिधित्वाशी काहीही संबंध राहणार नाही, हे सुनिश्चित करण्याचा सरकार प्रयत्न करत आहे. विरोधी पक्षनेते पुढे म्हणाले की, आपली सत्ता कमी होण्याच्या भीतीने भाजप भारताचा राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न करत आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### खापरखेडातील महापारेषणच्या उपकेंद्रात स्फोट ...

**नागपूर :** उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेत वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमध्ये पुन्हा एकदा वाढ झाली आहे. त्यामुळे खापरखेडा येथील महापारेषणच्या 220 केव्ही उपकेंद्रात तांत्रिक बिघाडामुळे झालेल्या स्फोटाने अर्धे नागपूर आणि संपूर्ण भंडारा जिल्हा सुमारे 20 मिनिटे अंधारात बुडाला. या घटनेमुळे नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागला, तर विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान त्रास सहन करावा लागला. महापरेशनच्या उपकेंद्रातून महावितरणाच्या वीजवाहिन्यांना वीजपुरवठा केला जातो. मात्र, या महत्त्वाच्या प्रणालीतील बिघाडामुळे मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा खंडित झाला. अनेक भागांतील नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागला.

### एसटी महामंडळात 'ग्रॅज्युटी' घोटाळा, कामगार संघटना आक्रमक

**नागपूर :** एसटी महामंडळात निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपदान (ग्रॅज्युटी) वेळेत न दिल्याने त्यावर करोडो रुपयांचे व्याज द्यावे लागत आहे. या घोटाळ्यात सहभागी एसटी मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र, एसटी कर्मचारी कॉंग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे. एसटी महामंडळात कर्मचाऱ्यांसाठी उपदान विश्वस्त मंडळ असून त्यातून निवृत्तीनंतर 30 दिवसांच्या आत ग्रॅज्युटी रक्कम देण्यात येते. ग्रॅज्युटीची कमाल मर्यादा 20 लाख इतकी असली तरी कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकरीच्या कालावधी प्रमाणे कमी जास्ती ग्रॅज्युटी रक्कम देण्यात येते. नियमाप्रमाणे 30 दिवसाच्या आत ही रक्कम दिली नाहीतर यावरील महिन्याला अंदाजे सरासरी दहा टक्के इतके व्याज निवृत्त कर्मचाऱ्यांना द्यावे लागते. संबंधित काम हाताळणारे कर्मचारी सुट्टीवर आहेत असे सांगून सुद्धा ग्रॅज्युटी उशिरा दिली जाते, असे बरगे यांनी सांगितले. त्याच प्रमाणे निवृत्त होणारे कर्मचारी व अधिकारी यांनी कर्मचारी निवासस्थान न सोडल्याने त्याच प्रमाणे अपराध प्रकरणी कारवाई अपूर्ण राहिली असल्याचे कारण सांगून सुद्धा ही रक्कम वेळेवर देण्यात येत नाही.

### दीक्षाभूमीच्या 'दुबई' स्टाईल विकासावरून हायकोर्टानी केली मंत्र्यांची कानउघाडणी

**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दोन वेगवेगळ्या प्रकरणात राज्यातील दोन मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्याचे परिवहन मंत्री यांनी एसटी महामंडळाची जागा भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय घेतला. शासकीय जागा पाच-दहा वर्षांसाठी नव्हे तर तब्बल 90 ते 100 वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर देण्याचा हा निर्णय आहे. या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. दुसरीकडे, नागपूरमधील दीक्षाभूमीच्या विकास अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. दीक्षाभूमीचा विकास करण्यासाठी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दीक्षाभूमीचा विकास दुबई-सिंगापूरच्या धर्तीवर करण्याबाबत अधिकाऱ्यांना निर्देश दिले. या दोन्ही प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने मंत्र्यांच्या भूमिकेवर आणि त्यांच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## बँक ऑफ महाराष्ट्रमध्यून 20 मिनिटांत 35 लाख लुटले...




**भोपाल :** मध्य प्रदेशातील सिंगरौली जिल्ह्यातील बैढन परिसरात शुक्रवारी दुपारी एका थरारक बँक दरोड्याने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. 'बँक ऑफ महाराष्ट्र'च्या शाखेत 5 सशस्त्र दरोडेखोरांनी घुसून केवळ 15 ते 20 मिनिटांत 35 लाख रुपयांची रोकड आणि मोठ्या प्रमाणात सोन्या-चांदीचे दागिने लुटले. दरोडेखोरांनी दहशत निर्माण करण्यासाठी बँकेत फायरिंग केली आणि विरोध करणाऱ्या बँक मॅनेजरवर जीवघेणा हल्ला केला. दुपारी 12:50 च्या सुमारास, जेव्हा बँकेत ग्राहकांची वर्दळ होती, तेव्हा दोन चेहरा लपविलेले तरुण आत शिरले. त्यांच्या मागोमाग इतर तीन साथीदार हातात पिस्तूल आणि शस्त्रे घेऊन आले. बँकेत शिरताच दरोडेखोरांनी कर्मचाऱ्यांना धमकावण्यास सुरुवात केली. जेव्हा शाखा व्यवस्थापकाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना शस्त्राच्या दांड्याने बेदम मारहाण करण्यात आली. अवघ्या 20 मिनिटांत दरोडेखोरांनी कॅश काऊंटर आणि तिजोरीतील 35 लाख रुपये बॅगेत भरले. जाताना त्यांनी बँकेतील सीसीटीव्ही प्रणालीचे नुकसान करण्याचाही प्रयत्न केला. दरोडा टाकल्यानंतर सर्व आरोपी दुचाकीवरून जंगलाच्या दिशेने पसार झाले. घटनेची माहिती मिळताच सिंगरौली पोलीस अधीक्षक आणि मोठा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. संपूर्ण जिल्ह्याची नाकेबंदी करण्यात आली असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. 'आम्ही सीसीटीव्ही फुटेज तपासत असून आरोपींना लवकरच अटक केली जाईल,' असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## नाशिक टीसीएस प्रकरण निदा खानच्या पतीची नाशिक पोलिसांकडून चौकशी



**नाशिक :** महिला कर्मचाऱ्यांशी संबंधित लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणात फरार असलेल्या निदा खानच्या पतीची नाशिक पोलिसांनी शुक्रवारी सुमारे चार तास चौकशी केली. यापूर्वी, टीसीएसने जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, कंपनीने आपली कर्मचारी निदा खान हिला निलंबित केले होते. महाराष्ट्रातील नाशिक येथे कथित धर्मांतराच्या प्रकरणात निदा खान मुख्य आरोपी म्हणून समोर आली आहे.
दरम्यान, नाशिक पोलिसांच्या विशेष तपास पथकाने या प्रकरणातील फरार आरोपी असलेल्या निदा खानच्या पतीची त्यांच्या मुंब्रा येथील घरी जवळपास चार तास चौकशी केली.

## 'होर्मुझची सामुद्रधुनी' सागरी मार्ग सुरक्षित वाहतुकीसाठी खुला ठेवण्याची घोषणा : इराण




**नवी दिल्ली :** इस्त्रायल-लेबनॉन युद्धबंदीच्या पार्श्वभूमीवर इराणने जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'होर्मुझची सामुद्रधुनी' हा सागरी मार्ग सुरक्षित वाहतुकीसाठी खुला ठेवण्याची घोषणा केली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले की, या काळात सर्व व्यापारी जहाजांना विनाअडथळा आणि सुरक्षित प्रवासाची परवानगी दिली जाईल. ही परवानगी युद्धबंदी संपण्यापर्यंतच असणार आहे, हे देखील इराणने स्पष्ट केले आहे. इराणच्या 'पोर्ट्स आणि मॅरिटाइम ऑर्गनायझेशन'ने निर्धारित केलेल्या मार्गावरूनच जहाजांना प्रवास करावा लागेल. समुद्री व्यापार प्रभावित होऊ नये आणि जागतिक पुरवठा साखळी सुरळीत राहावी, यासाठी इराणने हे पाऊल उचलले आहे. दुसरीकडे, अमेरिकेने इराणच्या बंदरांवर कडक नाकेबंदी लागू केली असतानाही इराणने आपली तेल निर्यात सुरूच ठेवली आहे. 'केपलर' या मॅरिटाइम ट्रॅकिंग फर्मने दिलेल्या माहितीनुसार इराणचे डीप सी, सोनिया-I आणि डायोना हे तीन मोठे तेल टँकर हॉर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून यशस्वीपणे बाहेर पडले आहेत.
अमेरिकेने सोमवारीच इराणच्या तेल निर्यातीवर निर्बंध घालण्यासाठी नाकेबंदी केली होती. मात्र, इराणने खार्ग आयलंडवरून भरलेले हे टँकर बुधवारी सुरक्षितपणे बाहेर काढले. 10 एप्रिल रोजी 'स्टारला' नावाचा टँकर बाहेर पडल्यानंतरची ही इराणची सर्वात मोठी तेल निर्यात मानली जात आहे.

## राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत



**नागपूर :** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांचा अपघातात मृत्यू झाला. दोघेही तृतीय वर्षाचे विद्यार्थी होते व रात्री जेवण करून वसतिगृहात परत येतांना कच्च्या रस्त्यावरील खोलगट भागात पडून त्यांचा अपघात झाला. विद्यापीठाजवळच निर्जन ठिकाणी ही घटना घडली. दुर्दैवाची बाब म्हणजे रात्रभर ते त्याच ठिकाणी पडून होते. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. एका विद्यार्थ्याचे वडील न्यायाधीश असून, दुसऱ्या विद्यार्थ्याचे वडील वकील आहेत. या प्रकारामुळे विधि विद्यापीठात खळबळ उडाली आहे. विद्यार्थी वसतिगृहातून बाहेर गेले असताना प्रशासनाला कल्पना कशी आली नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. सक्षम विनोद बन्सोड (20, पिरॅमिड सिटी, बेसा) व आर्यन रवींद्र सोनटक्के (20, यवतमाळ) अशी मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत. सक्षमचे वडील विनोद बन्सोड हे वर्धा येथे सहदिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) व अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी असून, आर्यनचे वडील रवींद्र सोनटक्के हे यवतमाळ येथे वकील आहेत. सक्षम व आर्यन विधि विद्यापीठाच्या वसतिगृहात राहत होते. बुधवारी रात्री ते दोघे आणखी एका मित्रासह जेवायला गेले होते. येताना सक्षम व आर्यन एकाच मोटारसायकलवर होते, तर त्यांचा मित्र दुसऱ्या दुचाकीवर होता. तिघेही वर्धा मार्गावरून जेवण करून मध्यरात्रीच्या सुमारास परत आले. तिसरा मित्र वसतिगृहाच्या दिशेने आत गेला. मात्र सक्षम व आर्यन संस्कृत विद्यापीठाच्या दिशेने गेले. तेथे अंधार होता व वळणावर त्यांचे संतुलन बिघडले व दोघेही खोलगट भागात जाऊन पडले.

## मतदारसंघ पुनर्रचना हे सरकारचे काम नाही, ते आयोगाचे काम : कॉंग्रेस



**नवी दिल्ली :** कॉंग्रेसचे खासदार मनीष तिवारी म्हणाले की, संसदीय जागांची संख्या ठरवणे हे सरकारचे काम नसून ते परिसीमन आयोगाचे काम आहे. प्रस्तावित परिसीमन प्रक्रियेवरून सुरू असलेल्या राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही टिप्पणी केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दक्षिणेकडील राज्यांच्या लोकसभा प्रतिनिधित्वावर परिसीमन प्रक्रियेमुळे होणाऱ्या संभाव्य परिणामाबद्दलची चिंता दूर करण्याचा प्रयत्न केला होता, त्यावर तिवारी प्रतिक्रिया देत होते. तिवारी म्हणाले की, सरकार केवळ जागांची कमाल आणि किमान मर्यादा निश्चित करू शकते. त्यांनी प्रस्तावित 131 व्या घटनादुरुस्ती विधेयकाचा संदर्भ दिला, ज्यानुसार जागांची कमाल मर्यादा 850 निश्चित करण्यात आली आहे. तिवारींच्या मते, 2011 च्या जनगणनेच्या आधारे प्रत्येक राज्याला किती जागा मिळतील हे ठरवणे परिसीमन आयोगाचे काम आहे. तिवारी यांनी आरोप केला की सरकार प्रामाणिकपणे वागत नाहीये. ते म्हणाले की, मूळ मुद्दा संविधानाच्या कलम 82(1अ) मध्ये आहे, जे भारतीय लोकशाहीचे मूलभूत तत्व मांडते 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य.' त्यांनी पुढे स्पष्ट केले. कॉंग्रेस खासदाराने सरकारच्या भूमिकेवर टीका केली आणि आरोप केला की, सरकार महिला आरक्षण विधेयकाच्या नावाखाली मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेला हायजॅक करण्याचा प्रयत्न करत आहे.

## 19000 कोटींचे कर्ज, CBI, ED चा तपास



**नवी दिल्ली :** आर्थिक घडामोडींच्या पत्रकार सुचेता दलाल यांनी स्टेरलिंग बायोटेक या कंपनीशी संबंधित 'गॅग ऑर्डर'ला आव्हान दिले आहे. बँक फसवणूक प्रकरणात स्टेरलिंग बायोटेक कंपनीशी संबंधित काही बातम्या 'मनीलाइफ' या वृत्तसंस्थेच्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून प्रकाशित करण्यात आल्या होत्या. न्यायालयाने त्या बातम्या हटवण्याचे आदेश दिले मेटा व गुगलला दिले आहेत. गॅग ऑर्डर म्हणजे एखादी बातमी किंवा माहिती सार्वजनिक करण्यापासून व्यक्ती किंवा माध्यमांना रोखले जाते. दिल्लीतील न्यायालयाने स्टेरलिंग कंपनीसाठी गॅग ऑर्डर काढत मेटा व गुगलला कंपनीच्या मालकांशी संबंधित कंटेंट हटवण्यास सांगितले. त्यानुसार संबंधित कंटेंट ऑनलाइन माध्यमांवरून हटवण्यात आले आहे.
स्टेरलिंग बायोटेक या कंपनीने गुजरातमध्ये औषधे क्षेत्रात कामकाज सुरू केले होते. 2010 च्या मध्यात कंपनीने इतर क्षेत्रात कामकाज सुरू करून विस्तार करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी कंपनीने कर्ज घेतले. त्या कर्जाची परतफेड करण्यास कंपनी असमर्थ ठरली. कंपनीवर मनी लॉंडरिंग, कर्जाचा गैरवापर, कर्ज डुबवल्याचा तसेच आर्थिक व्यवहार उघड न केल्याचे आरोप करण्यात आले. त्यानंतर या प्रकरणात सक्तवसुली संचलनालय (ईडी) आणि सीबीआयने तपास सुरू केला. कंपनीचे संस्थापक नितीन व चेतन संदेसारा यांच्यावर बँकेची 19 हजार कोटी रूपयांहून अधिकची फसवणूक केल्याचा आरोप झाला. पत्रकार सुचेता दलाल यांनी या प्रकरणात न्यायालयात धाव घेतली आहे. दिल्लीतील तीस हजारी न्यायालयाचे न्यायाधीश विनोद कुमार मिना यांनी या गुगल, मेटा (फेसबुकची पॅरेंट कंपनी) आणि स्टेरलिंग कंपनीचे संचालक व संस्थापक मनोज संदेसारा यांना नोटीस बजावली आहे. माध्यमांच्या स्वातंर्त्यावर मर्यादा तसेच सेन्सॉरशीप लावण्याचा हा प्रकार असल्याने सुचेता दलाल यांनी या प्रकरणाशी संबंधितांना आव्हान दिले. पुढील सुनावणी 29 एप्रिल रोजी होणार आहे.

### 36 तासांत यूआरएल लिंक, ऑनलाइन कंटेंट डिलिट करण्याचे आदेश ?

शर्मा यांनी संदेसारा यांच्या मागण्या मान्य करत गुगल, मेटा या कंपन्यांना नोटीस बजावली. तसेच 36 तासांत या प्रकरणाशी संबंधित स्टेरलिंग कंपनी व संदेसारा यांचा उल्लेख असलेले सगळे ऑनलाइन कंटेंट, यूआरएल लिंक्स (URL Links) हटवण्यात यावेत, असा आदेश कंपन्यांना दिला. न्यायाधीश रिचा शर्मा यांनी अत्यंत दुर्मिळ प्रकरणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'एक्स पार्टे एड-इंटरिम इंजक्शन'चा वापर केला. यात समोरील पक्षाची बाजू ऐकून न घेता न्यायाधीशांना आदेश देता येतो. न्यायाधीश रिचा शर्मा यांनी दिलेल्या आदेशात मत नोंदवले आहे की, माध्यमांना देण्यात आलेले स्वातंर्त्य हा त्यांना दिलेला पूर्ण अधिकार नाही. माध्यमांनी त्यांच्या स्वातंर्त्याचा मर्यादा ठेवून वापर करावा. स्टेरलिंग कंपनीच्या संस्थापकांना फरार, पैशांची अफरातफर करणारे आणि फसवणूक करणारे म्हटले असल्याचे प्रकाशित झालेल्या बातम्यांमध्ये प्राथमिकदृष्ट्या दिसून येत आहे. ज्यावेळी संबंधित बातम्या प्रकाशित झाल्या त्यावेळी या प्रकरणाबाबत कोणतीही ठोस माहिती समोर आली नव्हती, असे निरीक्षण न्यायाधीश शर्मा यांनी नोंदवले आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली
स्मृतीशेष हिरालालजी कांबळे
तृतीय पुण्यनुमोदन



जन्म 14 जुलै 1942
मृत्यु 18 एप्रिल 2023
'बाबा,तुमचे असणं आमच्यासाठी सर्व काही होत, आज सर्व काही असल्याची जाणीव आहे
परंतु तुम्ही आमच्यात नसणे ही खूप मोठी उणीव आहे'
: शोकाकुल :
डॉ. चंद्रमणी कांबळे (मुलगा), डॉ. सूर्यकांता कांबळे (सुन),
परितोष कांबळे (नातू), सुदीती कांबळे (नातीन)
आणि समस्त कांबळे परिवार

बहुजन सौरभ संपादकीय

# महिला आरक्षण राजकीय स्टंट?

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात महिला आरक्षण कायदा 2023 हा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून सादर केला जात आहे. मध्यरात्री सरकारने नोटिफिकेशन काढत हा कायदा लागू केल्याची घोषणा केली आणि देशभरात ‘नारी शक्ती’च्या जयघोषांनी वातावरण भारावून गेले. परंतु, या घोषणांच्या गदारोळामध्ये एक मूलभूत प्रश्न सतत डोके वर काढतो, हा निर्णय खऱ्या अर्थाने महिलांच्या सशक्तीकरणासाठी आहे की तो केवळ राजकीय वेळ साधून खेळलेला एक प्रभावी डाव आहे? या कायद्यानुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कागदावर पाहता हा निर्णय ऐतिहासिक वाटतो, कारण भारतात आजही महिलांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. लोकसभेत महिलांची संख्या 15 टक्क्यांपेक्षाही कमी आहे, ही वस्तुस्थिती लाजिरवाणी आहे. त्यामुळे आरक्षणाची गरज कोणीही नाकारू शकत नाही. मात्र, या कायद्याची अंमलबजावणी तात्काळ न होता ती जनगणना आणि परिसीमन प्रक्रियेशी जोडण्यात आली आहे, ही बाब संशय निर्माण करणारी आहे. याचा सरळ अर्थ असा की हा कायदा प्रत्यक्षात 2029 किंवा त्यानंतरच लागू होईल. म्हणजेच आज गाजावाजा आणि उद्या अंमलबजावणी, हीच या निर्णयाची खरी कथा आहे. राजकारणात ‘टायमिंग’ला प्रचंड महत्त्व असते आणि या कायद्याच्या संदर्भात ते स्पष्टपणे दिसून येते. निवडणुका जवळ आल्यावर महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी हा मुद्दा पुढे आणला गेला, असा आरोप विरोधक करत आहेत. जर सरकारची भूमिका खरोखरच प्रामाणिक असती, तर हा कायदा तात्काळ लागू करण्याची तयारी दाखवली गेली असती. परंतु तसे न करता तो भविष्यातील प्रक्रियांवर अवलंबून ठेवण्यात आला आहे, यामुळे या निर्णयामागील राजकीय हेतूंवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे या कायद्यात सामाजिक न्यायाच्या दृष्टीने मोठी उणीव आहे. अनुसूचित जाती आणि जमातींसाठी उप-आरक्षण देण्यात आले असले तरी इतर मागासवर्गीय (OBC) महिलांसाठी कोणतीही स्वतंत्र तरतूद नाही. भारतासारख्या बहुविध सामाजिक रचनेत ‘महिला’ हा एकसमान वर्ग नाही. जाती, वर्ग, आर्थिक स्थिती आणि शैक्षणिक संधी यांचा महिलांच्या प्रगतीवर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे OBC महिलांना या आरक्षणात स्थान न देणे म्हणजे सामाजिक वास्तवाकडे दुर्लक्ष करणे होय. याचबरोबर, पंचायत स्तरावरच्या अनुभवाकडे पाहिले, तर एक वेगळे चित्र दिसते. महिलांसाठी आरक्षण दिल्यानंतर अनेक ठिकाणी महिलांची निवड झाली, परंतु प्रत्यक्षात निर्णय घेण्याची सत्ता त्यांच्या कुटुंबातील पुरुषांकडेच राहिली. ‘सरपंच पती’ ही संकल्पना त्यातूनच उदयास आली. त्यामुळे केवळ आरक्षण देऊन महिलांचे खरे सशक्तीकरण होईल का, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. जर राजकीय पक्षांचे तिकीट वाटप, आर्थिक संसाधने आणि सत्तेची सूत्रे पुरुषांच्या हातातच राहणार असतील, तर 33 टक्के आरक्षण हे केवळ आकड्यांचे राजकारण ठरेल. या कायद्याला परिसीमन प्रक्रियेशी जोडल्यामुळे आणखी एक मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. परिसीमनामुळे राज्यांच्या जागांमध्ये बदल होऊ शकतो आणि त्याचा परिणाम देशाच्या राजकीय संतुलनावर होऊ शकतो. उत्तर आणि दक्षिण भारतातील प्रतिनिधित्वाच्या प्रश्नांवरून आधीच मतभेद आहेत. अशा परिस्थितीत महिला आरक्षणाच्या नावाखाली नवीन राजकीय समीकरणे तयार करण्याचा प्रयत्न होत आहे का, हा संशय अधिकच गडद होतो. महिला आरक्षण कायदा हा नक्कीच आवश्यक आणि स्वागतार्ह निर्णय आहे, पण तो अपूर्ण आहे. तो खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी पुरेसा नाही. महिलांना केवळ जागा देणे पुरेसे नाही, तर त्यांना निर्णय घेण्याची खरी सत्ता, आर्थिक स्वायत्तता आणि राजकीय पाठबळ देणेही तितकेच आवश्यक आहे. अन्यथा, हा कायदा केवळ एक प्रतिकात्मक उपक्रम ठरेल. शेवटी, हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर राजकीय इच्छाशक्तीचा आहे. सरकारने महिलांच्या सशक्तीकरणाचा दावा करत असताना, त्याची अंमलबजावणी तात्काळ आणि प्रभावीपणे करण्याची तयारी दाखवली पाहिजे. अन्यथा, ‘नारी शक्ती’च्या घोषणा या फक्त घोषणाच राहतील आणि महिलांचे खरे सशक्तीकरण पुन्हा एकदा राजकारणाच्या गर्तेत हरवेल. महिलांना न्याय देण्याची ही संधी आहे, ती इतिहास घडवण्यासाठी वापरली जाणार की केवळ राजकीय फायद्यासाठी, हे येणारा काळच ठरवेल. ■ ■

# महिला सशक्तीकरणाचा आव आणून संघराज्य पद्धतीवर घाव...




भारतीय लोकशाहीच्या इतिहासात 16 एप्रिल 2026 हा दिवस एक विशेष दिवस म्हणून नोंदला जाण्याची शक्यता आहे. संसदेच्या विशेष त्रिदिवसीय अधिवेशनात केंद्र सरकार तीन ऐतिहासिक विधेयकांचे एक व्यापक पॅकेज मांडणार आहे. यामध्ये संविधान (131वा दुरुस्ती) विधेयक, 2026; परिसीमन विधेयक, 2026 आणि केंद्रशासित प्रदेश कायदा (दुरुस्ती) विधेयक, 2026. या तिन्ही विधेयकांचा घोषित उद्देश एकच आहे की 2023 साली संमत झालेला नारी शक्ती वंदन अधिनियम (106वा घटनादुरुस्ती) प्रत्यक्षात लागू करणे. मात्र या विधायकीमागे दडलेला राजकीय हेतू आणि संघराज्यीय समतोलावर होणारे परिणाम यांची व्याप्ती कितीतरी अधिक गहन असून लक्षात घेणे खूप गरजेचे आहे.

नारी शक्ती वंदन अधिनियमानुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे, कारण सध्याच्या 17व्या लोकसभेत केवळ 78 महिला सदस्य आहेत म्हणजे एकूण जागांच्या केवळ 14.39 टक्के. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील ही संख्या जागतिक सरासरीपेक्षाही जी सुमारे 26.5 टक्के असून खूप कमी आहे. त्यामुळे महिला आरक्षणाची संकल्पना तत्त्वतः कुणीही नाकारणार नाही. परंतु खरा प्रश्न हा आहे की, सरकार हे आरक्षण परिसीमनापासून वेगळे का करत नाही? जर उद्देश खरोखरच महिला सशक्तीकरण हा असेल, तर सध्याच्या 543 जागांपैकी एक-तृतीयांश म्हणजे सुमारे 181 जागा महिलांसाठी राखीव करण्यास कोणती अडचण आहे? विरोधी पक्षांनी हाच मुद्दा उचलला आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी थेट प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना खुले पत्र लिहून या तिन्ही गोष्टी महिला आरक्षण, राष्ट्रीय परिसीमन आणि लोकसभेतील जागांची वाढ एकमेकांशी जोडण्याची गरज नाही, असे ठामपणे नमूद केले आहे. सरकार मात्र या तिन्ही गोष्टी एकत्र घेऊनच पुढे जाण्यावर अडून आहे, यातच खरा धोका दडलेला आहे. संविधान (131वा दुरुस्ती) विधेयक, 2026 अंतर्गत लोकसभेतील जागांची संख्या सध्याच्या 543 वरून थेट 850 पर्यंत नेण्याचा प्रस्ताव आहे. यापैकी 815 जागा राज्यांसाठी आणि 35 जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी असतील. एक-तृतीयांश आरक्षणानुसार यात महिलांसाठी सुमारे 270 हून अधिक जागा राखीव राहतील आणि बहुमतासाठी सुमारे 426 जागांची आवश्यकता भासेल. हे आकडे वरवर प्रगतीचे चित्र मांडतात, परंतु हे परिसीमन 2011 च्या जनगणनेच्या आधारावर होणार असल्याने त्याचे भौगोलिक परिणाम राज्यानुसार आमुलाग्र भिन्न असतील. उपलब्ध अंदाजांनुसार उत्तर प्रदेशाच्या जागा 80 वरून 140 वर जातील, बिहारच्या 40 वरून 73 वर, राजस्थानच्या 25 वरून 48 वर आणि मध्य प्रदेशच्या 29 वरून 51 वर जातील. याउलट दक्षिणेकडे तामिळनाडूच्या जागा 39 वरून केवळ 51 वर जातील, केरळच्या 20 वरून अवघ्या 23 वर जातील आणि आंध्र प्रदेश व तेलंगणाच्या एकत्रित जागा 42 वरून 59 वर जातील. या आकड्यांचा राजकीय अर्थ स्पष्ट आहे. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान आणि मध्य प्रदेश ही सर्व राज्ये भाजपची पारंपरिक मतपेटी आहेत. या राज्यांतील जागांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणार असल्याने लोकसभेतील भाजपचे संख्याबळ आपोआप मजबूत होईल. दुसरीकडे, तामिळनाडू, केरळ, आंध्र, तेलंगणा यांसारख्या दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणांचे काटेकोर पालन केले, त्यामुळे त्यांची लोकसंख्यावृद्धी मंद राहिली आणि आता त्यांनाच या शहाणपणाची ‘शिक्षा’ भोगावी लागणार आहे. ज्या राज्यांनी स्त्री-शिक्षण वाढवण्यासाठी, माता मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि कुटुंब नियोजनासाठी दशकांपासून प्रामाणिक प्रयत्न केले, त्यांना राजकीय सत्तेत कमी वाटा मिळणे हे एक प्रकारचा दुहेरी दंड आहे. याउलट, ज्या राज्यांनी या क्षेत्रांत कमी प्रगती केली, त्यांना परिसीमनात मोठा फायदा होतो. हे चित्र विकासाचा धडा शिकवण्याऐवजी चुकीच्या धोरणांना बळ देते. या विधेयकांनी दक्षिण भारतात प्रचंड राजकीय खळबळ माजवली आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी संपूर्ण राज्यात काळे झेंडे फडकवण्याचे आवाहन केले आहे आणि त्यांनी इशारा दिला आहे की, उत्तर भारतीय राज्यांचे राजकीय वर्चस्व विषमतेने वाढवले गेले तर प्रत्येक कुटुंब रस्त्यावर उतरेल. त्यांनी डीएमके संसद सदस्यांची आणीबाणीची बैठक बोलावली आणि मोठ्या आंदोलनाची तयारी असल्याचे जाहीर केले. केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन, आंध्र आणि तेलंगणातील नेतेही या सुरात सूर मिसळत आहेत. विरोधी पक्षनेत्यांच्या मते, परिसीमन म्हणजे भारताच्या संघराज्यीय रचनेवर घाव घालण्याचा प्रयत्न आहे. केंद्रातील गृहमंत्री अमित शहा यांनी हे आरोप ‘घाबरवणूक’ असल्याचे फेटाळून लावले असले तरी, दक्षिणेकडील राज्यांतील ही तीव्र प्रतिक्रिया केवळ राजकीय नाटकाचा भाग नाही, तर ती संरचनात्मक असमतोलाची खोल आणि रास्त जाणीव आहे. या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा धागा म्हणजे जनगणनेचा विलंब. भारतात दर दहा वर्षांनी जनगणना होणे अपेक्षित आहे. 2021 साली होणारी जनगणना कोविड-19 साथीचे कारण देऊन प्रथम पुढे ढकलण्यात आली हे अंशतः समजण्यासारखे होते. मात्र कोविडचे संकट ओसरल्यानंतरही जनगणना झाली नाही. कोणत्याही ठोस कारणाशिवाय तारीख पुढे सरकत राहिली आणि अखेर शांतपणे घोषित करण्यात आले की जनगणना 2026-27 मध्ये पूर्ण केली जाईल. संविधानाच्या तरतुदींनुसार, लोकसभा जागांच्या आंतरराज्यीय वाटपावर असलेली मर्यादा जी 1971 च्या जनगणनेवर आधारित होती 2026 नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेचे आकडे प्रकाशित झाल्यानंतरच संपुष्टात येणार होती. याचा सरळ अर्थ असा की, सामान्यतः परिसीमन 2031 च्या जनगणनेच्या आधारावर झाले असते. मात्र जनगणना आधी घेऊन, म्हणजे संविधानाच्या कालमर्यादेत बसवत, सरकारने परिसीमनाची वेळ स्वतःच्या सोयीनुसार निश्चित केली आहे. हे योगायोग नाही; हे सुनियोजित राजकारण आहे. या संपूर्ण राजकीय समीकरणातील एक गुंतागुंतीचा पदर म्हणजे विरोधी पक्षांची प्रारंभीची द्विधा मनःस्थिती. सुरुवातीला त्यांच्यापुढे एक कठीण पेच होता जर विधेयकांना विरोध केला, तर भाजप त्यांना महिला आरक्षणाचे शत्रू ठरवेल आणि जर समर्थन केले, तर परिसीमनाच्या माध्यमातून भाजपचे राजकीय वर्चस्व बळकट होईल. मात्र हळूहळू विरोधी पक्ष या पेचातून बाहेर पडत आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील ‘इंडिया’ आघाडीने आपली भूमिका स्पष्ट केली आहे की सर्व पक्ष महिला आरक्षणाच्या बाजूने आहेत, परंतु परिसीमनाच्या बाजूने नाहीत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी विरोधी पक्षनेत्यांची बैठक झाली, जिथे या खोल दोषपूर्ण आणि संघराज्यविरोधी परिसीमन प्रक्रियेला विरोध करण्याचा निर्धार करण्यात आला. विरोधी पक्षांनी दोन पर्यायी प्रस्तावही पुढे ठेवले आहेत. एक म्हणजे प्रत्येक राज्याचा संसदेतील टक्केवारी हिस्सा फ्रीझ करणे आणि दुसरे म्हणजे महिला आरक्षण आधी लागू करणे व परिसीमन नंतरसाठी राखून ठेवणे.


विकास परसराम मेश्राम

मो.7875592800


हे विधेयक पारित करण्यासाठी घटनादुरुस्ती आवश्यक असल्याने संसदेत दोन-तृतीयांश विशेष बहुमत लागेल. सध्याच्या लोकसभेत भाजप-नेतृत्वाखालील एनडीएकडे साधे बहुमत असले तरी विशेष बहुमतासाठी काही प्रमाणात विरोधी पक्षांची साथ अपरिहार्य आहे. यामुळे सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यातील आगामी दिवसांतील घमासान अधिकच निर्णायक बनणार आहे. कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल सांगतात की लोकशाही अधिक समावेशक बनवणे हा उद्देश आहे, जिथे अर्ध्या लोकसंख्येला त्यांचा हक्क मिळेल. सरकारचा युक्तिवाद असाही आहे की महिला आरक्षण 2029 च्या लोकसभा निवडणुकीआधी लागू करायचे असेल तर परिसीमनाची प्रक्रिया त्वरेने होणे गरजेचे आहे. मात्र हाच प्रश्न पुन्हा उरतो परिसीमनाशिवाय आरक्षण का देता येत नाही?

भारताची संसदीय लोकशाही संघराज्यीय तत्त्वावर उभी आहे. प्रत्येक राज्याला, त्याच्या आकाराने, लोकसंख्येने किंवा भौगोलिक स्थानाने, संसदेत योग्य आणि न्याय्य प्रतिनिधित्व असणे हा या रचनेचा गाभा आहे. लोकसंख्येच्या आधारावर केलेले परिसीमन जर राज्यांच्या विकासाशी असलेल्या कार्यकारण संबंधाकडे डोळेझाक करत असेल, तर ते संघराज्यीय न्यायाच्या तत्त्वाशी विसंगत ठरते. महिला आरक्षण हे निःसंशय काळाची गरज आहे. जगातील अनेक देशांनी रवांडा जिथे 61 टक्के संसद सदस्य महिला आहेत, आइसलँड, स्वीडन महिला राजकीय सहभागाच्या बाबतीत भारतापेक्षा कितीतरी पुढे मजल मारली आहे. परंतु हे उद्दिष्ट साधण्यासाठी संघराज्यीय समतोल धोक्यात घालण्याची खरोखरच गरज आहे का? विरोधी पक्ष आणि दक्षिणेकडील राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी मांडलेला उपाय तर्कसंगत आहे. सध्याच्या 543 जागांपैकीच एक-तृतीयांश जागा महिलांसाठी आरक्षित करा आणि परिसीमनाचा प्रश्न स्वतंत्रपणे व व्यापक राजकीय एकमताने सोडवा. मात्र सरकार या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जखडून ठेवण्यावर आग्रही आहे, यातच त्यांच्या खऱ्या हेतूचा सुगावा लागतो. 16 ते 18 एप्रिल 2026 या तीन दिवसांत घेतले जाणारे निर्णय भारतीय लोकशाहीचे स्वरूप दशकांसाठी घडवतील. महिला आरक्षण या संकल्पनेला नाकारण्याचा कुणाचाही इरादा नाही. परंतु हे आरक्षण परिसीमनासाठी राजकीय ढाल म्हणून वापरले जात असेल, तर ते महिलांच्या हक्कांचा खरा आदर नाही, तर त्यांचा राजकीय वापर आहे. संसदीय भूगोल बदलण्याचा आग्रह, जनगणनेत जाणीवपूर्वक केलेला विलंब आणि आता या विलंबाचा उपयोग आपल्या सोयीचे परिसीमन घडवण्यासाठी हे सारे धागे एकत्र विणले की एक स्पष्ट चित्र समोर येते. ते चित्र महिला सशक्तीकरणाचे नाही, तर राजकीय सत्ताकेंद्रीकरणाचे आहे. लोकशाहीची खरी कसोटी अशी असते की, आपण ज्या शब्दांचा वापर करतो त्यांच्या मागे खरी श्रद्धा आहे का? जर महिलांना खऱ्या अर्थाने न्याय द्यायचा असेल, तर महिलांचा कोटा आणि संघराज्यीय समता या दोन्ही गोष्टी एकत्र जपणे अशक्य नाही. त्यासाठी फक्त प्रामाणिक इच्छाशक्ती लागते आणि तीच आज सर्वांत दुर्मिळ झाली आहे. ■ ■

# विवाह संस्कारातील साक्षगंध
## एक प्रेरणादायी प्रसंग




आमचे परिचित नायर परिवार मूळ केरळचे, रोजगारासाठी चाळीस वर्षांपूर्वी नागपुरात आले आणि मनाने पूर्ण नागपूरकर झाले. त्यातील भाग्यश्री, उच्चशिक्षित आदर्श शिक्षिका, तिचा काल संगीथ सोबत साक्षगंधाचा कार्यक्रम जाफर नगरजवळील अय्यप्पा मंदिरात संपन्न झाला. मोजक्या नातेवाईकांच्या आणि विश्वकर्मा नगरातील शेजाऱ्यांच्या साक्षीने हा सोहळा झाला. ना डीजे, ना कल्ला, ना नाच-गाणे, ना मटकणे, फक्त सुसंस्कारांचा सोहळा. नवजोडीतील मुलगा लुंगी-सदऱ्यात, मुलगी सुंदर साडीत स्टेजवर आले आणि पाटावर बसले. दोघांचे आई-वडील पारंपरिक पेहरावात मागे उभे होते. समोर केरळी पद्धतीचे जाड पितळेचे गोल भांडे (पायली) ठेवलेले होते. त्या पायलीत प्रथम मुलीच्या आईने ओंजळभर धान (तांदूळ नाही, धान!) भरले, मग वडिलांनी पायली शिगेपर्यंत भरली. त्यात नारळाच्या झाडाच्या झुबकेदार फुलांच्या दांड्या रोवल्या. हे पाहताना मनात आले, धानच का? तांदूळ का नाही? आपण सारे कृषी संस्कृतीचे पाईक आहोत. तांदूळ पेरला तर उगवत नाही, धानच पेरावे लागते. धान हीच खरी लक्ष्मी. मुलीचा संसार धनधान्याने फुलावा, तिने दिलेल्या मुठभर धानाचे हजारो दाणे व्हावेत, हा त्या विधीमागचा गूढ अर्थ. सोबत पेटलेल्या समया तेजोमय जीवनाचा संकेत देत होत्या. अंधःकार दूर होऊन नवजीवनाची वाट उजळावी. साध्या वेषातील एका व्यक्तीने (पंडिताच्या वेषात नव्हे) दोन्ही परिवारांचा परिचय करून दिला. मग एक ‘करार-पत्र’ मुलाच्या वडिलांकडून मुलीच्या वडिलांकडे, तिथून मुलीच्या आईकडे गेले. तसेच मुलीच्या वडिलांकडून मुलाच्या वडिलांकडे आणि मुलाच्या आईकडे. वडीलधाऱ्यांनी एकमेकांना आलिंगन देऊन स्वागत केले, नातेवाईकांनीही परस्परांना आलिंगन दिले. मुला-मुलीने एकमेकांच्या बोटात अंगठी घातली. उपस्थितांनी टाळ्या वाजवून स्टेजवर जाऊन नवदाम्पत्याला आशिर्वाद दिला. पंधरा-वीस मिनिटांचा हा संस्कारविधी सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद, जेवणाचा स्वाद आणि वेळेचे भान जपणारा. श्रीमंतीचा दिखावा नाही, फक्त संस्कारांचा सोहळा. असे आदर्श सोहळे समाजात घडावेत, हेच खरे. ■ ■

जनक्रांतीच्या पाऊलवाटा




ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक

मो. 9823966282


# भगवान भरोसे भारत




मागील काही दिवसात नाशिक येथील लिंगपिसाट ज्योतिष कॅप्टन अशोक खरात प्रकरण गाजले आहे. दुसऱ्यांचे भविष्य, जन्मकुंडली सांगणाऱ्या खरात स्वतःचेच भविष्य आणि कुंडली चव्हाट्यावर आली. लैंगिक शोषण, बलात्कार आणि जादूटोण्याच्या आरोपाखाली त्याला नाशिक पोलिसांनी अटक केली. आता तो तुरुंगवासाची हवा खात आहे. या कारस्थानात लिप्त असलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला.

भारतातील सुप्रसिद्ध म्हणवणाऱ्या अनेक ज्योतिष आणि पुरोहितांची 28 फेब्रुवारी 2026 रोजी दुबईमध्ये ‘आंतरराष्ट्रीय ज्योतिष परिषद’ आयोजित झाली होती. त्या दरम्यान ईरानद्वारे दुबईतील क्रिक हार्बर वर बॉम्ब टाकण्यात आला. सर्व ज्योतिष दुबईत अडकले, चिंताग्रस्त, भयग्रस्त झाले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांना भारतात येण्यासाठी सरकारची याचना करावी लागली. जागतिक किर्तीच्या या ज्योतिष्यांना दुबईतील युद्धजन्य संकटाचे साधे भविष्य पाहता आले नाही. ते स्वतःचे भविष्य पाहू शकले नाही, पण इतरांचे भविष्य सांगून सामान्यांना लुबाडत आहेत. यातून या ज्योतिष्यांनी स्वतःच्या शास्त्राचेच धिंडवडे काढले आहे. भारतीय घटनेचे कलम 51 ए हे नागरिकांचे मूलभूत कर्तव्य म्हणून ‘वैज्ञानिक दृष्टीकोन, शोधकबुद्धी विकसित करणे’ असे नमूद करते. परंतु सत्ताधारी मात्र अशा अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे कार्य करत आहेत. आधुनिक शिक्षा पद्धतीत असे लुबाडणीच्या ज्योतिष शास्त्राचा समावेश करणे हेच दर्शवते.

प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा म्हणून 2021 साली GC ने ज्योतिष्य शास्त्राचा उच्च शिक्षणात समावेश केला आहे. ज्योतिष शास्त्र (Astrology)हे वेदाचे सहावे अंग असल्याचे सांगून मास्टर्स डिग्री (एम. ए.) मध्ये ज्योतिष शास्त्राचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. अर्थात ज्योतिषशास्त्र आणि धर्म यांचा संबंध अत्यंत प्राचीन आणि दृढ असल्याचे सांगण्यात येते. अलीकडे उघडपणे शिक्षण क्षेत्रात धार्मिकता बळावली आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण 2020 घोरणात प्राचीन ज्ञानाचा भाग म्हणून शाळा व महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात भगवतगीता आणि वेदांचा समावेश करण्यात आला आहे. आधुनिक विज्ञानाला डावलून आज प्राचीन, पुरातन काळात नेणाऱ्या धर्माचे गुणगान करत आहेत. वास्तविक आधुनिक शिक्षण आणि संपूर्ण जग उत्क्रांत होत आहे. सुधारणावादी लोकांनी जुन्या परंपरा आणि धर्मविरोधी कार्य केल्यामुळे जगाचा विकास शक्य झाला आहे. आज ‘एआय’ तंत्रज्ञाननामुळे विज्ञान-तंत्रज्ञानाने जगात प्रचंड बदल घडून आला आहे. बदलत्या विकासात मात्र धर्माचे योगदान शून्य आहे. अध्यात्मवादी विज्ञानाला महत्व देत नाहीत, पण ते विज्ञानाने निर्मित सुखसोयींचा क्षणोक्षणी उपभोग घेत असतात. विकासाची दिशा देण्याचे श्रेय मानवनिर्मित विज्ञानाला न देता काल्पनिक ईश्वराला देतात. कारण... खुद्द देशाचे प्रधानसेवक स्वतःला ईश्वराचे अवतार मानतात. स्वतःला नॉन बायोलॉजिकल घोषित करुन ते स्वतःचा परमात्म्याशी प्रत्यक्ष संबंध असल्याचे सांगतात. देशाचे संरक्षण मंत्री लिंबू मिर्ची लावून राफेल विमानाची पूजा केल्यानंतर विमान भारतात आणतात. ईस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी अंतराळ मोहीम यशस्वी होण्यासाठी यानाची प्रतिकृती तिरूपती मंदिरात ठेऊन पूजाअर्चा केली होती. भारतातील विज्ञानवादी शास्त्रज्ञ माणसाच्या कर्तृत्वाला आणि संशोधनाला महत्व न देता त्याचे श्रेय ईश्वर नावाच्या काल्पनिक अस्तित्वाला देतात. वास्तविक विज्ञानात देवाधर्माला कोणतेही स्थान नाही. विज्ञानाला धर्माची आवश्यकताही नाही. धर्मामुळे विज्ञानाची प्रगती झाली नाही. भारतात 33 कोटी देवीदेवता आहेत पण बहुतांश तंत्रज्ञान अन्य देशातून आयात केले जाते. भारतीय अंधभक्त लॉजिकपेक्षा मॅजिक ला महत्व देतात. भारतात डॉक्टरांपेक्षा तांत्रिकांची भरमार आहे. येथे संशोधन केंद्रापेक्षा आश्रमांची संख्या अधिक आहे. चिकित्सकांपेक्षा अंधविश्वासुंची संख्या वेगाने वाढत आहे. विकसित देशात भारताचे स्थान नाही पण देशाला विश्वगुरू म्हणण्यात येथील बहुसंख्य जनता धन्यता मानतात.

काल्पनिक अस्तित्वाला नाकारणाऱ्या चार्वाक नंतर तथागत बुद्धांनी ईश्वराचे अस्तित्व नाकारले. तथागतांनी अनिश्वरवाद, अनात्मवाद आणि अनित्यवाद सांगितला. 1530 मध्ये कोपरनिकस यांनी प्रयोगांती सिद्ध केले की पृथ्वी ईश्वराने निर्माण केली नाही. हे सत्य सांगणाऱ्या कोपरनिकसला देश सोडून जावे लागले होते. चार्ल्स डार्विन यांनी 50 वर्षाच्या संशोधनानंतर पृथ्वीवरील प्राणीमात्रांचा निर्माता ईश्वर नसून विकासवाद असल्याचे सिद्ध केले. या सत्यशोधनानंतर डार्विनला ईश्वराचा मारेकरी समजण्यात आले. आधुनिक काळात महात्मा ज्योतीबा फुले यांनी ईश्वराऐवजी शिक्षणाला महत्व दिले. ज्योतिबा फुले म्हणतात मंदिर म्हणजे मानसिक गुलामी! संत गाडगेबाबा स्वतः अशिक्षित होते पण डोळस, विज्ञानवादी होते. ते कधीही मंदिरात गेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 22 प्रतिज्ञा देऊन ईश्वर नामक संकल्पनेला कोट्यावधींच्या जीवनातून हद्दपार केले, अंधश्रद्धेतून त्यांना बाहेर काढले. भारतात मोठमोठे तथाकथित विद्वान, उच्च शिक्षित विविध पूजाअर्चा करताना दिसतात. दिवाळीमध्ये लक्ष्मीची पूजा करतात. लक्ष्मीपूजन करणाऱ्या भारतात प्रचंड गरीबी आहे. अनेक तथाकथित देवीदेवतांनी अन्य देश सोडून भारतातच जन्म घेतला. त्यात ब्राह्मणांच्या आर्थिक सोयीसाठी विविध मंदिरांची निर्मिती करण्यात झाली आहे. 2014 नंतर तर देशात मंदीरांचे पेव फुटले आहे. मंदिरामुळे पंडित, पुजाऱ्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न निकाली लागला. अन्य तरुण रोजगारासाठी सर्वत्र भटकत आहेत. त्यावर 2047 नंतर विचार केला जाईल. कारण 2047 पर्यंत भारत विश्वगुरू होणार आहे. ■ ■




श्रीराम बनसोड,

8208617748


# पुरोगामी महाराष्ट्र झाला सुन्न?




नाशिकमधील भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेला धक्का दिलेला आहे. श्रद्धेच्या नावाखाली होणारी लूट किती भयावह आणि ती घराघरात किती विदृप पद्धतीने शिरू शकते याचे हे सुन्न करणारे उदाहरण. अशा घटना घडल्या की लोक संताप व्यक्त करतात, निषेध करतात आणि दोषींना शिक्षा व्हावी अशी मागणी करतात. पण या संतापाच्या पलीकडे एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो, असे भोंदू आपल्या घरात कधीही येऊ नये यासाठी आपण काय करतो? या प्रश्नाचे उत्तर केवळ कायदा किंवा पोलिसांमध्ये नाही. देव आणि धर्माच्या नावाने उभ्या राहिलेल्या अंधश्रद्धेच्या भयंकर बाजाराचा खरात हा प्रतिनिधी आहे. ज्योतिष्य, मंत्र-तंत्र, जादूटोणा, ग्रहशांती, वास्तुदोष, नागबळी, शनीची अवकृपा निवारण्याचे आश्वासन देणारे असंख्य ढोंगीबुवा-बाबा आपल्या समाजात फिरत आहेत. खरातला विरोध करताना ज्योतिष, मंत्र-तंत्र आणि चमत्काराच्या नावाने चालणाऱ्या संपूर्ण फसवणुकीसाठी आपल्या घराचे दरवाजे कायमस्वरूपी बंद असावेत. विशेष करून माझ्या देशामध्ये देवाधर्माच्या नावाखाली व्यवसाय कराला, धंदा करायला कुठल्याही एजन्सीकडून किंवा संस्थेकडून लायसनची गरज नाही किंवा भोंदू बाबा बनायला शिक्षणाची किंवा डिग्रीची अट नाही. अशा भोंदू बाबांना आपला व्यवसाय चालविण्याकरिता जाहिरातीचा मुळीच खर्च नाही. एखादा कच्चा मेंदूचा असलेला व्यक्ती तो बराबर अशा भोंदू बाबांचा पद्धतशीर प्रचार करीत असतो. मला खूप चांगली अनुभूती आली, लाभ झाला, मी डिप्रेशनमध्ये गेलो होतो, आता बाहेर निघालो असे अनेक बहाने सामोरच्या व्यक्तीला तिखट-मीठ लावून सांगून त्यालासुद्धा या अंधश्रद्धेकडे ओढण्याचे काम करीत असतात. एक उदाहरण घ्या सत्यनारायणाची कथा आपल्या महाराष्ट्रामध्ये प्रत्येक नवदांपत्याचे लगीन झाल्यानंतर सत्यकथा शांती करता केली जाते. खरेच हे सत्यनारायण या जोडप्यांना सत्य स्वरूपाचा आभास होतो काय? दोन महिने होत नाही तर फॅमिली कोर्टमध्ये केसेस जातात. घटस्फोटाचे प्रकरण देशा मध्ये वाढत आहेत, तर काही महिला आत्महत्या करतात. कुठे गेला आमचा सत्यनारायण? अशा अनेक प्रकरणामध्ये अंधश्रद्धेला समाज बळी पडत आहे. तसेच उच्चशिक्षित लोक जास्त बळी पडत आहे. आपल्या महाराष्ट्राच्या या संतांच्या भूमीला काळीख पोतणाचे काम हे ढोंगी बाबा करित आहे. या करता सर्व महाराष्ट्रातील सुजाण माता-भगिनींनी, नागरीकांनी अंधश्रद्धेला हद्दपार करूया, समोर येवून भोदूंबाबांचा भंडाफोड करून आपण परत त्या संतांच्या कार्याला बळ देऊ या! असा संकल्प करण्याची तसेच पुढाकार घेण्याचे नितांत काळाची गरज आहे. ■ ■




डी. एन. लाखे.

94229 21286


# विश्वगुरू चा बोटचेपेपणा पाकिस्तानच्या पथ्यावर पडलेले अपयश




भारताने स्वतःला ‘विश्वगुरू’ म्हणून मिरवण्याचा जो राजकीय प्रवाह गेल्या दशकात उभा केला, त्याची वास्तवाशी तुलना केली तर अनेक प्रश्न अनुत्तरित उभे राहतात. जागतिक स्तरावर प्रभावी, निर्णायक आणि नैतिक नेतृत्व देणारा देश अशी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला; पण इराण-इस्त्रायल/अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने घेतलेली भूमिका पाहता ही प्रतिमा केवळ घोषणांपुरती मर्यादित असल्याचे स्पष्ट होते. उलट, या परिस्थितीत पाकिस्तानने मध्यस्थी करत शस्त्रसंधी प्रक्रियेत भूमिका घेतल्याने भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने स्वतःची प्रतिमा जागतिक स्तरावर उंचावल्याचा दावा सातत्याने केला गेला. ‘56 इंचाची छाती’, ‘निर्णायक नेतृत्व’, ‘नवभारत’ अशा घोषणांमधून एक मजबूत प्रतिमा उभी करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात आंतरराष्ट्रीय संकटाच्या वेळी भारताची भूमिका ‘प्रतिक्षेत बसणाऱ्या प्रेक्षकासारखी’ दिसते. इराण-इस्त्रायल संघर्षाच्यावेळी भारताने कोणतीही ठोस मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला नाही. फक्त सर्व पक्षांशी संवाद साधण्याची औपचारिक भूमिका घेतली गेली. यामुळे ‘विश्वगुरू’ ही संकल्पना केवळ राजकीय ब्रँडिंग ठरते का, हा प्रश्न निर्माण होतो. याउलट पाकिस्तानने या संघर्षात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला आणि शस्त्रसंधी चर्चेचे आयोजन इस्लामाबादमध्ये केले. हा तोच पाकिस्तान आहे, ज्याच्यावर दहशतवादाला खतपाणी घालण्याचे आरोप भारत सातत्याने करत आला आहे. अशा देशाने शांतता प्रक्रियेत पुढाकार घेतल्याने भारताच्या परराष्ट्र धोरणावर नैसर्गिकच टीका होते. पाकिस्तानचा उद्देश काहीही असो, प्रतिमा सुधारण्याचा किंवा राजकीय लाभ मिळवण्याचा. परंतु त्याने घेतलेला पुढाकार हा ‘डिप्लोमॅटिक स्कोअर’ म्हणून नोंदवला जात आहे. भारताच्या या निष्क्रियतेचे परिणाम केवळ प्रतिमेपुरते मर्यादित नाहीत, तर त्याचे थेट आर्थिक परिणामही देशाला भोगावे लागत आहेत. इराणवरील हल्ल्यांनंतर आणि होर्मूझ समुद्रधुनीवरील तणावामुळे जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला. भारत 90 टक्के कच्चे तेल आयात करतो आणि त्यातील मोठा हिस्सा आखातातून येतो. त्यामुळे तेलाच्या किंमती वाढल्याने देशात महागाई वाढली, रुपयावर दबाव आला आणि सामान्य नागरिकांच्या खिशाला फटका बसला. स्वयंपाक गॅस, पेट्रोल-डिझेल, वाहतूक आणि दैनंदिन गरजांच्या वस्तू महाग झाल्या. म्हणजेच परराष्ट्र धोरणातील कमकुवतपणाचा थेट परिणाम जनतेवर झाला. इतिहासात पाहिले, तर भारताने अनेक वेळा अधिक ठाम भूमिका घेतली आहे. 1971 मध्ये बांगलादेश मुक्तिसंग्रामाच्या वेळी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी अमेरिकेच्या दबावाला न जुमानता ठाम निर्णय घेतला. त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची भूमिका प्रभावीपणे मांडली आणि युद्ध जिंकत बांगलादेशाची निर्मिती घडवून आणली. त्या काळात भारताची प्रतिमा स्वतंत्र, धाडसी आणि निर्णायक देश म्हणून उभी राहिली. आजच्या परिस्थितीत अशा प्रकारचे नेतृत्व दिसून येत नाही, हीच मुख्य टीका आहे. आज भारत ‘ग्लोबल साउथ’चा नेता असल्याचा दावा करतो, पण त्या नेतृत्वाची कसोटी अशा संकटकाळातच लागते. जर भारताने इराण-इस्त्रायल संघर्षात सक्रिय भूमिका घेतली असती, शस्त्रसंधीसाठी प्रयत्न केले असते, तर त्याची प्रतिमा अधिक बळकट झाली असती. परंतु तसे न करता, भारताने केवळ औपचारिक प्रतिक्रिया देऊन स्वतःला मर्यादित ठेवले. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची भूमिका दुय्यम ठरते. याचबरोबर, देशांतर्गत राजकारणालाही या परिस्थितीत प्राधान्य दिले गेले, अशी टीका होते. जागतिक संकटाच्या काळातही निवडणूक प्रचारावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले, तर दुसरीकडे सामान्य नागरिक गॅस आणि इंधनाच्या वाढत्या किंमतींनी त्रस्त झाले. यामुळे सरकारच्या प्राधान्यक्रमांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. ‘विश्वगुरू’ होण्यापेक्षा ‘स्वदेशातील समस्या सोडवणारा जबाबदार नेता’ होणे अधिक आवश्यक आहे, हे वास्तव या प्रसंगाने अधोरेखित केले.परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ‘भारत दलाल राष्ट्र नाही’ असे विधान केले. या विधानाचा अर्थ भारत मध्यस्थी करणार नाही, असा घेतला गेला. परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणात मध्यस्थी करणे हे दुर्बलतेचे नव्हे, तर सामर्थ्याचे लक्षण असते. शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेणे हे नेतृत्वाचे लक्षण आहे. त्यामुळे अशा विधानांमुळे भारताची भूमिका अधिकच गोंधळलेली दिसते. शेवटी, ‘विश्वगुरू’ ही संकल्पना केवळ घोषणांनी सिद्ध होत नाही. त्यासाठी ठोस कृती, निर्णायक भूमिका आणि जागतिक पातळीवर प्रभावी हस्तक्षेप आवश्यक असतो. आजच्या परिस्थितीत भारताने त्या दिशेने पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा, ‘विश्वगुरू’ हा शब्द केवळ राजकीय भाषणांपुरता मर्यादित राहील आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याची खिल्ली उडत राहील. भारताने आता वास्तव स्वीकारून सक्रिय, संतुलित आणि धाडसी परराष्ट्र धोरण स्वीकारणे गरजेचे आहे. अन्यथा, आपल्या निष्क्रियतेचा फायदा शेजारी देश घेत राहतील आणि ‘विश्वगुरू’ होण्याचे स्वप्न केवळ घोषणांमध्येच अडकून राहील. ■ ■


विकास झाडे

"जो शिकत राहतो, तोच पुढे जातो..."

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# भ्रम आणि भीती यांचे जाळ्यात अडकू नका!



जनगणना 2026 ची शासकीय स्तरावर घोषणा होऊन त्याची प्रशासकीय तयारी सध्या सुरु आहे. मोजक्या निवृत्त अधिकाऱ्यांनी बौद्धांनी जनगणनेत बौद्ध आणि महार लिहावे, असे सार्वजनिकपणे सांगणे सुरू केले आहे. बौद्ध आणि महार अशी सरमिसळ करणे कायदेशीरदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या व मानसशास्त्रीयदृष्ट्या योग्य नाही. म्हणून ते भ्रम पसरविणारे आहे. आपले मुक्तिदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजयादशमीचे दिनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी बौद्ध धम्माचे दिक्षेला आज एकूण 70 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या दरम्यान 6 वेळा जनगणना झाली. या 70 वर्षांच्या प्रदीर्घ काळात सदर निवृत्त अधिकाऱ्यांनी स्वतः या अगोदर असे बौद्धांना कधीही आवाहन केले नाही की बौद्ध आणि महार नोंदणी करा. मग आजच अशी नोंद करावी याची त्यांना का आवश्यकता भासत आहे? जनगणनेचा कायदा 1948 पासून सारखाच आहे, मग आज खडबडून जागे होऊन बौद्धांना सांगण्याची गरज काय? सदर निवृत्त अधिकाऱ्यांच्या वयोमानाप्रमाणे त्यांनी या अगोदरच्या 3 जनगणनेत सहभाग घेतला होता. तर त्यावेळी बौद्ध आणि महार लिहा असे जनगणना 1991, जनगणना 2001 आणि जनगणना 2011 वेळी त्यांनी का सांगितले नाही. असा कळीचा प्रश्न उपस्थित होतो. त्यावेळी त्यांच्या चुपचाप राहण्याची कारणे काय? आणि असे 3 दशक चुपचाप राहण्याच्या पार्श्वभूमीवर आज अचानक जनगणना 2026 वेळी त्यांचा बौद्ध समाजाबद्दल कळवळा का जागृत झाला? असा गहन प्रश्न निर्माण झाला आहे. सन 1956 ते 2026 पर्यंत बौद्ध समाजाला राजकीय नेते आणि साहित्यिक विचारवंतांची समृद्ध परंपरा आहे. राजकीय नेत्यांमध्ये नाशिकचे दादासाहेब गायकवाड नागपूरचे बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, ॲड. हरिदास आवळे, रा. सु. गवई, ॲड. ना. ह. कुंभारे तसेच मुंबईचे ॲड. बी. सी. कांबळे, आर. डी. भंडारे, दादासाहेब रूपवते इत्यादी होते. सर्व नेते डॉ. बाबासाहेबांच्या तालमीत तयार झाले होते. अनेक जण प्रथितयश वकील होते. मग बौद्ध आणि महार लिहा अशी उपरती त्यांच्या संपूर्ण जीवनात त्यांना का झाली नाही? त्यांनी 1956 नंतर का असे म्हटले नाही की तुमचे महार म्हणून जनगणनेत लिहिणे आवश्यक आहे? तसेच साहित्यिक विचारवंतांचे प्राचार्य म. ना. वानखेडे, प्राचार्य म. भी. चिटणीस, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, वामनराव निंबाळकर, गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, बंधू माधव, त्र्यंबक सपकाळे आणि नंतरचे राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार इत्यादींची मांदियाळी आहे. त्यांनी अनेक मराठीच्या दिग्गजांना वादात लोळविले आहे. समाजजीवनाच्या अनेक अंगानी त्यांचा अभ्यास होता आणि त्यांनी तसे लिखाण सुद्धा केले आहे. मग अशा वैचारिक लेखकांनी 1956 नंतर का कधीही सांगितले नाही की तुमचे महार असणे अधोरेखित करणे आवश्यक आहे? याचाच अर्थ असा आहे का की अनेक राजकीय नेत्यांना आणि साहित्यिक विचारवंतांना जनगणनेत बौद्ध आणि महार लिहिण्याचे फायदे समजले नाही. परंतु असे फायदे काही निवृत्तांना समजले. परंतु असा निष्कर्ष काढू शकत नाही. कारण व्यक्ती म्हणून राजकीय नेते आणि साहित्यिक विचारवंतांचे पारडे अत्यंत जड आणि भक्कम आहे. त्यांची तुलना बौद्ध आणि महार लिहा सांगणाऱ्या निवृत्ताने सोबत होऊ शकत नाही. म्हणून निवृतांचा जनगणनेत बौद्ध आणि महार लिहा असा पर्याय खारीज केला पाहिजे. जनगणनेत बौद्ध आणि महार लिहा असे सांगणारांनी त्याचे 3 परिणाम आरक्षण, बजेट आणि ॲट्रोसिटी/अत्याचार असे सांगितले आहेत. बौद्ध समाज शिक्षण व नोकरी आणि राजकीय आरक्षणाचा फायदा घेत आहे. राजकीय आरक्षण कुचकामी आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र भारताची पहिली निवडणूक 1952 साली झाली तेव्हाच लक्षात आले आणि डॉ. बाबासाहेबांनी राजकीय आरक्षण तेव्हाच नाकारले. आज अनेक नाकर्ते

## बौद्ध लिहा

प्रतिनिधी राजकीय आरक्षणामार्फत निवडून जात आहेत आणि त्याचा अनुभव सार्वत्रिक आहे. इतकेच नव्हे तर काही समाजद्रोही सुद्धा त्याचा फायदा घेत आहेत. जनगणनेचा अशा समाजासाठी निकामी राजकीय आरक्षणावर निश्चितच परिणाम होणार आहे. परंतु तो जागा कमी होण्याचा परिणाम किरकोळ आणि अत्यल्प असेल. कारण राजकीय आरक्षित जागा लोकसंख्येच्या प्रमाणात असतात. सर्व बौद्ध समाजाने याची नोंद घ्यावी की राजकीय आरक्षणाची मर्यादा 10 वर्षे असून त्याला संसदेच्या कायद्याची कार्यकाल वाढविण्यासाठी आवश्यकता असते. परंतु आजपर्यंत एकाही नेत्याने अथवा राजकीय पक्षाने न मागता अशी वाढ सतत दर 10 वर्षांनी का होते? याचाच अर्थ असा की निरुपयोगी राजकीय आरक्षण दर 10 वर्षांनी लादले जाते. अशा कुचकामी राजकीय आरक्षणवर जर थोडा वाईट परिणाम होत असेल त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे. जनगणना 2026 चा कुठल्याही वाईट परिणाम शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणावर निश्चित होणार नाही. याचे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे आजची अनुसूचित जातींची लोकसंख्या आणि आजचे कायदे होत. जनगणना 2011 प्रमाणे भारतातील अनुसूचित जातींची लोकसंख्या आरक्षणापेक्षा जवळपास एक टक्क्याने जास्त आहे. म्हणजे महाराष्ट्रातील सर्व एक करोड डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी जनगणना 2026 मध्ये फक्त आणि फक्त बौद्ध लिहिले तरी काहीही फरक शिक्षण आणि नोकरीमधील आरक्षणावर पडणार नाही. लोकसंख्याशास्त्राप्रमाणे लोकसंख्या कमी न होण्याचा दर प्रत्येक विवाहित जोडप्यांचा 2.9 आहे. आणि सदर दर अनुसूचित जातींचा 4.5 आहे. याचाच अर्थ असा की महाराष्ट्रातील बौद्धांमुळे एकूण अनुसूचित जातींच्या संख्येचा मर्यादित आरक्षण टक्केवारीवर कुठलाही वाईट परिणाम होणार नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार शिक्षण आणि नोकरीतील आरक्षण 50 टक्केपेक्षा जास्त असू शकत नाही आणि कधी अशी आरक्षण मर्यादा तमिळनाडूप्रमाणे 69 टक्क्याकडे वाढली तर जाट, मराठा, पटेल असे अनेक जाती समूह आरक्षण मागण्याच्या रांगेत अगोदरच अनेक भीषण आंदोलने करत उभे ठाकले आहेत. याचाच अर्थ असा की जनगणना 2026 मध्ये महार लिहिण्याचा शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणावर कुठलाही फायदा नाही. शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणा बाबत अनेक प्रश्न आहेत. परंतु त्या प्रश्नांची पाळेमुळे इतरत्र आहेत. म्हणून त्याचे उत्तर जनगणना 2026 मध्ये नाही. शिक्षण खाजगीकरणामुळे महाग आणि दुर्मिळ झाले आहे. शाळा शासनाने बंद करण्याचा सपाटा लावला आहे. नोकरीला आरक्षण खाजगीकरणामुळे अत्यंत कमी झाले आहे. अनेक कामे कंत्राट पद्धतीने दिल्यामुळे शासकीय आणि नीम शासकीय नोकऱ्या कमी झाल्या. आरक्षण ठरविण्याच्या नियमात पक्षपाती बदल करून आरक्षित जागांची संख्या कमी केली आहे. तसाच बदल नोकरीतील बढती न देण्यासाठी सुद्धा केला आहे. लॅटरल एन्ट्री मार्फत आरएसएस चे स्वयंसेवक भरले जात आहेत. अशा अनेक शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणाचे प्रश्न मागील अनेक दशकांपासून साचून आहेत, ही सत्यस्थिती आहे. परंतु त्या शिक्षण आणि नोकरी मधील आरक्षणाच्या प्रश्नांची उत्तरे जनगणना 2026 मध्ये निश्चितच नाहीत. जसे आरएसएस-बीजेपी प्रणित सरकार 2014 साली स्थापन झाल्याबरोबर त्यांनी घेतलेला पहिला मोठा निर्णय म्हणजे 1950 साली स्थापन केलेला भारतीय नियोजन आयोग (Planning Commission of India) बरखास्त केला. आणि नीती आयोग स्थापना केला. त्याचा परिणाम म्हणजे कल्याणकारी राज्य (Welfare State) मोडीत निघण्यात झाला. SCP म्हणजे Special Component Plan आणि STP म्हणजे Special Tribal Plan अनुक्रमे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी या मार्फत शिक्षण व विकास योजनांसाठी पैसा येत होता. भारतीय नियोजन आयोग बरखास्त केल्यामुळे सदर हक्काचा पैसा गेला. परंतु त्यावेळी कोणीही निवृत्त अधिकारी त्या बाबत बोलले नाही आणि आज कमी होणाऱ्या वरील पैशाबाबत लागू नसलेला जनगणनेचा उपाय सांगत आहेत. Census Act 1948 चे कलम 15 नुसार आपण Population Commissioner यांना दिलेली माहिती गोपनीय असून तिचा वापर पुरावा म्हणून करता येत नाही. त्यामुळे जनगणना 2026 मध्ये दिलेल्या माहितीचा Atrocity Act अंतर्गत गुन्ह्यात काहीही संबंध येत नाही. भ्रम, भीती आणि शब्दच्छल ब्राम्हणवादाचे आणि त्याचे खतरनाक वारसदार आरएसएस ची अस्त्रे आहेत. तीच अस्त्रे आज जनगणना 2026 बाबत वापरली जात आहेत. प्रश्न अगदी साधा, सरळ आणि सुटसुटीत आहे आणि तो बौद्ध असण्याचा किंवा बौद्ध नसण्याचा आहे. म्हणून आम्ही भ्रम, भीती आणि शब्दच्छल याला बळी न पडता आमची ओळख बौद्ध म्हणून अधोरेखित केली पाहिजे. आरएसएस आणि बीजेपी ची 18 व्या शतकाकडे वाटचाल सुरू असून त्यांना त्यांची संहिता मनुस्मृती लागू करावयाची आहे. भारतीय राजघटना विरोधी हिंदू राष्ट्र त्यांचा आज उघड झालेला अजेंडा आहे. त्या अत्यंत दुष्ट आणि मानवता विरोधी अजेंड्यात सामील होऊ नका. महार लिहून हिंदूंची संख्या वाढवू नका. जनगणना 2026 मध्ये स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची फक्त आणि फक्त बौद्ध म्हणून स्वाभिमानाने नोंद करा. कारण आपल्याला आपले मुक्तिदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'प्रबुद्ध भारत' हे स्वप्न पूर्ण करावयाचे आहे. ■ ■

मिलिंद पखाले
मो. 9764470174

# आओ सुबह ढूंढते हैं.

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

आयुष्याच्या संध्याकाळी हे समजते की, ह्या जगात ना काही कमावण्या सारखे आहे ना काही गमावण्या सारखे आहे. ज्याप्रमाणे एखाद्या चित्रातील रंग हळूहळू ऊडून जातात तसेच एके दिवशी आपले प्राण पाखरू देखील ऊडून जाणार आहे. जसा जसा काळ बदलत जातो तसे तसे मनातील भाव बदलत जातात. ईच्छा , अपेक्षा सर्व बदलत जातात.

'कितना भी पकड़ लो, फिसलता जरूर है, ये वक्त है जनाब ! बदलता जरूर है '.

जसेजसे वय वाढत जाते . तसेतसे हळूहळू डोळ्यांनी अंधुक दिसू लागते. परंतु माणसांची पारख मात्र अनुभवाने अचूक करता येते . केवळ श्वासोश्वास बंद होणे म्हणजे मृत्यू नव्हे. आनंदाने जगता न येणे हाही एकप्रकारे मृत्यूच आहे. एक गोष्ट लक्षात ठेवा की, माणसाने कुणावर कितीही जिव ओवाळून टाकला तरी शेवटी माणसाला एकट्यानेच मरावे लागते. कुणीही सोबत येत नाही . म्हणून जोपर्यंत जिवंत आहोत तोपर्यंत आनंदाची अनुभूती घ्यावी. पण त्यासाठी हवे ते मनावर नियंत्रण. कारण नियंत्रित मन हा माणसाचा सर्वात जवळचा मित्र आहे. मन म्हणजे जे कधीही भरत नाही ते मन . मन हा खुप सुंदर शब्द आहे. मन ह्या शब्दापुढे ' न' हे अक्षर जोडले की नमन होते आणि मन ह्या शब्दाच्या मागे ' न ' हे अक्षर जोडले तर नमन होते. जर मनन आणि नमन करीत राहीले तर भय , चिंता ह्या गोष्टींचे दमन करणे सोपे होते. आयुष्यभर केलेल्या धावपळीचे फलित काय आहे ? तर ह्याचे उत्तर म्हणजे ' चेहरे पर झुर्रियाँ, और अपनों से दुरियाँ, जिंदगी समझ में आ गयी तो अकेले में मेला, और ना समझ में आयीं, तो मेले में अकेला '

म्हणून वेळीच संयम राखता आला पाहिजे. ' संयम म्हणजे , एक युद्ध, स्वतः विरूध्द '

म्हणून चला ! आनंदाने जगुया .

' चलो हँसने की कोई, हम वजह ढूंढते है, जिधर न हो कोई गम,वो जगह ढूंढते हैं, बहुत उड़ लिए, ऊँचे आसमानों में यारों , चलो जमीं पर ही कोई, हम सतह ढूंढते है, छूटा संग किचनों का , जिंदगी की जंग में, चलो उनके दिलों की , हम गिरह ढूंढते हैं, बहुत वक़्त गुज़रा , भटकते हुए अंधेरों में, चलो अंधेरी रात की, हम सुबह ढूँढते है '. ■ ■

# बौद्ध भारताची परंपरा आणि आजचे राजकारण : काही प्रश्न

**नि:शस्त्र बौद्ध वैचारिकतेने सम्राट अशोक ते बृहद्रथ मौर्य यांच्या काळात भारतात शांती, प्रेम, मैत्री, करुणा, दया, अहिंसा, प्रज्ञा, शील, बंधुत्व आणि समतेच्या मूल्यांनी समृद्ध अशी सभ्यता निर्माण झाली होती. या मूल्यांचा प्रभाव केवळ भारतावरच नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडावर पडला होता.**





अनिरुद्ध शेवाळे
मो. 9823368332

परंतु नंतर अंधश्रद्धा, कर्मकांड आणि सामाजिक विषमतेच्या विचारांनी या समतावादी परंपरेवर आघात केल्याचा आरोप अनेक अभ्यासक करतात. काही विचारवंतांचे मत असे आहे की, भारतीय इतिहासातील अनेक घटना आणि व्यक्तिमत्त्वांचे स्वरूप कालांतराने बदलले गेले. बौद्ध परंपरेतील विचार, बुद्धांच्या प्रतिमा आणि इतिहासाचे अनेक पैलू विकृत करून लोकांमध्ये अंधभक्ती आणि पौराणिक कथांचा प्रसार करण्यात आला. परिणामी, भारतातील समता, मानवता आणि विवेकशील परंपरेला धक्का बसल्याचे ते सांगतात. इतिहासाच्या संदर्भात संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, जिजाऊ माता आणि इतर अनेक संत-महापुरुष यांच्या संदर्भातही वेगवेगळ्या दाव्यांचा उल्लेख केला जातो. काहींचे मत आहे की या व्यक्तिमत्त्वांचा खरा इतिहास लोकांपर्यंत पूर्णपणे पोहोचलेला नाही. जगातील अनेक देशांनी बुद्धांच्या नीतिमूल्यांचा स्वीकार करून शांतता, विकास आणि सामाजिक प्रगती साधली, असे उदाहरण दिले जाते. त्याच्या तुलनेत भारतात मात्र धार्मिक आणि राजकीय ध्रुवीकरण वाढत असल्याची चिंता काही अभ्यासक व्यक्त करतात. शिक्षणव्यवस्था, इतिहासलेखन, धार्मिक कार्यक्रम आणि सार्वजनिक धोरणे यामध्ये विवेक, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि संविधानिक मूल्यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे, अशी मागणीही या संदर्भात पुढे येते. भारताच्या संविधानाने समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांची हमी दिली आहे. त्यामुळे देशातील कोणतीही राजकीय किंवा सामाजिक व्यवस्था या मूलभूत मूल्यांपासून दूर जाऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. आजच्या काळात समाजात वाढणारा जातीय द्वेष, हिंसा, अन्याय, तसेच महापुरुषांच्या स्मारकांवरील हल्ले किंवा अपमानासारख्या घटना लोकशाही व्यवस्थेसाठी चिंतेचा विषय ठरतात. अशा घटनांवर कठोर कारवाई व्हावी आणि समाजात मानवता, बंधुत्व आणि संविधानिक मूल्यांचा सन्मान टिकून राहावा, अशी अपेक्षा अनेक नागरिक व्यक्त करतात. भारत हा बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, गांधी, कबीर, तुकाराम यांसारख्या महापुरुषांच्या विचारांनी घडलेला देश आहे. त्यामुळे सत्य इतिहास, विवेकशील विचार आणि संविधानिक मूल्ये यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ■ ■



# अमेरिका-इस्त्रायल-इराक संघर्ष शांततेच्या शोधातील राजकारण

मध्यपूर्वेतील तणाव पुन्हा एकदा जागतिक चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. nited States, Israel आणि Iraq यांच्यातील वाढता संघर्ष केवळ प्रादेशिक नसून त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष Donald Trump यांनी मांडलेला युद्धविरामाचा प्रस्ताव आणि इस्त्रायलने पुढे केलेल्या अटी या दोन्ही बाबींचे सूक्ष्म विश्लेषण करणे आवश्यक ठरते. प्रथमदर्शनी Donald Trump यांचा प्रस्ताव हा शांततेच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल वाटतो. युद्धविराम, संवाद आणि आर्थिक सहकार्य यावर त्यांनी दिलेला भर हा योग्य दिशेने जाणारा प्रयत्न आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक प्रस्तावामागे काही ना काही राजकीय गणित दडलेले असते, हे विसरता येणार नाही. ट्रम्प यांच्या या पुढाकारामागे जागतिक स्तरावर स्वतःची प्रतिमा मजबूत करण्याचा आणि अमेरिकेच्या प्रभावाला पुर्नस्थापित करण्याचा हेतू असल्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे, Israel ची भूमिका ही सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत ठाम आणि कठोर आहे. दहशतवादावर पूर्ण नियंत्रण, सीमांचे संरक्षण आणि विरोधी शक्तींवर निर्णायक कारवाई या अटी इस्त्रायलसाठी अपरिहार्य आहेत. इतिहास पाहता, इस्त्रायलने नेहमीच आपल्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यामुळे कोणत्याही शांतता प्रक्रियेत या अटी दुर्लक्षित करणे अशक्य आहे. Iraq ची स्थिती मात्र अधिक गुंतागुंतीची आहे. अंतर्गत अस्थिरता, विविध गटांचा प्रभाव आणि बाह्यशक्तींचा दबाव यामुळे इराकला संतुलन राखणे कठीण जात आहे. एकीकडे शांततेचा मार्ग स्वीकारण्याची गरज, तर दुसरीकडे राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याची जबाबदारी, या द्वंद्वात इराक अडकलेला दिसतो. या संपूर्ण परिस्थितीकडे पाहताना United Nations आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. मात्र, अनेकदा या संस्थांचे प्रयत्न राजकीय हितसंबंधांमुळे मर्यादित राहतात, ही वस्तुस्थिती आहे. अखेरीस, या संघर्षाचे वास्तव असे आहे की, केवळ प्रस्ताव आणि अटी यांच्या आधारावर शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यासाठी परस्पर विश्वास, दीर्घकालीन धोरण आणि प्रामाणिक संवाद आवश्यक आहे. युद्धविराम हा केवळ पहिला टप्पा असतो; खरी कसोटी त्यानंतर सुरू होते. आजच्या घडीला जग एका महत्त्वाच्या वळणावर उभे आहे. जर या संघर्षाचा तोडगा निघाला नाही, तर त्याचे परिणाम आर्थिक, सामाजिक आणि राजकीय पातळीवर दूरगामी असतील. त्यामुळे सर्व संबंधित पक्षांनी अहंकार बाजूला ठेवून शांततेचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे. ■ ■



डॉ. केशव पाटील
मो.9890171364

# शिक्षणाचे अग्रदूत महात्मा ज्योतिराव फुले

**भारतीय समाजव्यवस्थेत शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. 19 व्या शतकात भारतीय समाजात शिक्षणावर काही विशिष्ट उच्चवर्गाचे वर्चस्व होते. स्त्रिया, शूद्र-अतिशूद्र आणि वंचित घटकांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. अशा अंध:कारमय परिस्थितीत महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजक्रांती घडवून आणली.**



महात्मा फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1827 रोजी पुणे येथे झाला. बालपणापासूनच त्यांनी सामाजिक विषमता अनुभवली. शिक्षण घेताना त्यांना जातीय भेदभावाचा सामना करावा लागला. याच अनुभवातून त्यांनी समाजातील अन्यायाविरुद्ध लढा देण्याचा निर्धार केला. त्यांच्या कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांचा मोलाचा सहभाग होता. महात्मा फुले यांच्या मते, शिक्षण हे सर्वांसाठी समान असले पाहिजे. त्यांनी शिक्षणाला 'मुक्तीचे साधन' मानले. त्यांच्या विचारांची प्रचीती पुढील ओळींमधून येते.

'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.'

या ओळींमधून त्यांनी अज्ञानामुळे समाजात होणारे नुकसान स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, शिक्षणामुळे अंधश्रद्धा आणि अज्ञान दूर होऊन समाजात समता प्रस्थापित होते. 1848 साली त्यांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. ही घटना भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी टप्पा ठरली. सावित्रीबाई फुले या त्या शाळेतील पहिल्या शिक्षिका होत्या. समाजाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी मुलींना शिक्षण देण्याचे कार्य अविरतपणे सुरू ठेवले. महात्मा फुले यांनी केवळ स्त्रीशिक्षणावर भर दिला नाही, तर शूद्र-अतिशूद्रांसाठीही शिक्षणाची दारे उघडली. त्या काळात खालच्या जातींना शिक्षण घेण्यास मनाई होती. त्यांनी या अन्यायाविरुद्ध संघर्ष करून शाळा सुरू केल्या. त्यांच्या मते, शिक्षणामुळेच वंचित समाज आपले हक्क ओळखू शकतो. 1873 मध्ये त्यांनी सत्यशोधक समाजची स्थापना केली. या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अन्याय दूर करणे होते. या माध्यमातून त्यांनी सामाजिक जागृती घडवून आणली आणि समानतेचा संदेश दिला. महात्मा फुले यांनी अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले. मुलींसाठी शाळा, शूद्र-अतिशूद्र मुलांसाठी शिक्षण, कामगारांसाठी रात्रीच्या शाळा आणि विधवांसाठी आश्रय व शिक्षण व्यवस्था. त्या काळात हे कार्य अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारी होते. त्यांच्या शिक्षणकार्यामुळे समाजात मोठे परिवर्तन झाले. स्त्रियांच्या शिक्षणाला चालना मिळाली, वंचित समाजात आत्मविश्वास वाढला आणि जातीय भेदभावाविरुद्ध जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यामुळे पुढील अनेक समाजसुधारकांना प्रेरणा मिळाली. आजच्या आधुनिक काळातही त्यांच्या विचारांची प्रासंगिकता तितकीच महत्त्वाची आहे. सर्वसमावेशक शिक्षण, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय या संकल्पना त्यांच्या विचारांवर आधारलेल्या आहेत. महात्मा फुले यांचे शिक्षणकार्य हे केवळ शैक्षणिक नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे साधन होते. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाशी जोडले आणि समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळेच महात्मा ज्योतिराव फुले यांना 'शिक्षणाचे अग्रदूत' असे संबोधणे योग्य ठरते. त्यांच्या विचारांचा अवलंब केल्यासच समाजात खऱ्या अर्थाने समता आणि न्याय प्रस्थापित होऊ शकतो ■ ■

प्रा. डॉ. वैशाली धनविजय
मो.9423110813

# तामकणे लेण्यांचे प्रवासवर्णन

**19 मार्च 2026 रात्री साधारण अकरा वाजले होते, शहर अजून झोपले नव्हते, पण आमच्यासाठी हा दिवस संपण्याचा नव्हता, तर सुरू होण्याचा होता. घाटकोपरहून बस निघाली आणि त्या बसमध्ये बसलेली प्रत्येक व्यक्ती फक्त प्रवासी नव्हती, ती इतिहासाच्या शोधात निघालेली होती. नेहमीप्रमाणे तेच ओळखीचे चेहरे, पुरळकर, बगाटे, कांबळे, गवई, माने, ओव्हाळ सर, हटकर, पाटील, सावंत, अनेक लेण्यांच्या प्रवासात एकत्र आलेली ही मंडळी आता कुटुंबासारखी झाली होती.**

दोन नवीन चेहरेही या प्रवासात सामील झाले होते, पण काही वेळातच तेही त्या एकजुटीत विरघळून गेले. मी ऐरोलीला बसमध्ये चढलो आणि लगेच जाणवले शरीर साथ देत नाही. पोटात असह्य वेदना, मनात शंभर प्रश्न. जावे का नको? दिवसभरात कित्येक वेळा ठरवले होते, नाही जायचे. पण काही प्रवास असे असतात, जे आपण ठरवत नाही, ते आपल्याला बोलावतात आणि म्हणूनच, बॅग भरली गेली, पावले बसकडे वळली आणि मी त्या प्रवासाचा भाग झालो. बसमध्ये गाणी सुरू होती, मित्रांमध्ये हशा होता, चर्चांचा ओघ सुरू होता, पण मी मात्र शांत होतो. माझे शरीर थकलेले होते, पण मन त्या लेण्यांमध्ये आधीच पोहोचले होते. पनवेलला बस थांबली, थोडा विरंगुळा. तिथे डोळस साहेब, जयंती पिलाने, नितीन जाधव असे काही सदस्य आमच्यात सामील झाले. बॅनर उघडला, फोटो काढला आणि पुन्हा प्रवास सुरू झाला. रात्रीच्या अंधारातून बस पुढे सरकत होती आणि मी संपूर्ण प्रवास झोपेतच पार करत होतो, कदाचित शरीराला विश्रांती देत, जेणेकरून मन पूर्णपणे हा अनुभव घेऊ शकेल. सकाळी सहाच्या सुमारास आम्ही पाटण येथे पोहोचलो. थंड वारा, हलकी धुके आणि निसर्गाची शांतता, सगळेच वेगळे वाटत होते. नाश्ता झाल्यानंतर गावातील दोन स्थानिक सोनवले साहेब, माने साहेब आमच्यासोबत आले. त्यांच्या बोलण्यात एक अभिमान होता, त्यांनी आम्हाला केवळ रस्ता दाखवला नाही, तर त्या लेण्यांचा शोध, त्यांची कथा, त्यांनी केलेले प्रयत्न याबद्दल सविस्तर सांगितले. जवळपास दीड तासाच्या विश्रांतीनंतर आम्ही तामकणे लेण्यांच्या दिशेने निघालो. तामकणे लेणी, डोंगराच्या कड्यात, ओढ्याच्या सान्निध्यात वसलेली, जणू निसर्गाच्या कुशीत विसावलेली. लेण्यांकडे जाणारा मार्ग हा स्वतःमध्ये एक अनुभव होता. अरुंद पायवाट, दाट झाडी, कधी मातीचा उतार, तर कधी दगडांवरून चढण, खाली वाहणारा ओढा आणि वर उभा असलेला डोंगर. त्या मार्गाने चालताना प्रत्येक पाऊल आपल्याला भूतकाळाच्या जवळ नेत होते. लेण्यांपर्यंत पोहोचल्यावर समोर उभ्या राहिलेल्या त्या साध्या पण प्रभावी रचना - विहार, लहान चैत्यगृह, त्यातील सुंदर स्तूप, सगळे काही अत्यंत शांत आणि संयमी वाटत होते. कोणताही दिखावा नाही, कोणतेही भव्य कोरीवकाम नाही, पण तरीही त्या जागेत एक विलक्षण शक्ती जाणवत होती. ओढ्याच्या मधोमध असलेली रचना, पाण्याची सोय, व्यापारी मार्गाशी असलेला संबंध, हे सगळे पाहताना स्पष्ट होते की, येथे कधीकाळी भिक्खूंचे जीवन किती सुस्थितीत आणि साधनेत व्यतीत झाले असेल. लेणी तुलनेने अलीकडेच (गेल्या 1-2 दशकांत) अधिक लक्षात आली आणि अभ्यासात आणली गेली आहेत. आम्ही तिथे साफसफाई केली, नंतर आमची सर्वांची एकमेकांना ओळख करून दिली, बुद्ध वंदना घेतली. लेणी अभ्यासात मला असे वाटते या लेण्यांचा कालखंड इ.स.पू. 2 रे शतक ते इ.स. 2 रे शतक (अंदाजे 200 BCE ते 200 CE) असा मानला जातो. हे काळ सातवाहन राजवंशाचा (Satavahana period) आहे, जेव्हा महाराष्ट्रात बौद्ध धम्माची खूप मोठी वृद्धी झाली होती. ही लेणी हिनयान (Theravada) पंथाशी संबंधित दिसते. कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण सध्या तरी दिसू येत नाही. परंतु अतिक्रमण होते आणि ते स्थानिकांनी कोणताही वाद न करता हटवले हे आम्हाला तेथे समजले. तामकणे लेण्या पाहून आम्ही पुढे येरफळच्या दिशेने निघालो. पण इथे पोहोचल्यावर अनुभव पूर्णपणे बदलला. आधीच तब्येत बिघडलेली, तरीही चालत चालत लेण्यांपर्यंत पोहोचलो. तेव्हा समोरचे दृश्य मनाला हादरवणारे होते. लेण्यांमध्ये विशेषतः स्तूपाजवळ भगवे आणि हिरवे कपडे, लाकडे पत्रे, लादी, सर्वत्र कचरा, प्राचीन रचना पूर्णपणे झाकलेली, दोन गुहा बंद आणि तिसऱ्या गुहेत शिवलिंग व पिंड बसवलेली. आजूबाजूला काही प्राचीन शिल्पे, वीरगळ ठेवलेली, पण त्यांचा मूळ संदर्भ हरवलेला. हे केवळ अतिक्रमण नव्हते, ही इतिहासाची ओळख बदलण्याची प्रक्रिया होती. आत गेल्यावर मी थेट झोपलो, शरीर पूर्णपणे थकलेले होते. पोटात खूप दुखत होते. तरीही कसातरी मी उठून निरीक्षण केले तर सहकाऱ्याने देखील लेणीचे निरीक्षण करून मॅप बनवला. आपण वंदना घेऊया असे मी सुचवले आणि कित्येक वर्षानंतर पुन्हा या लेणी वरती मेणबत्ती, अगरबत्ती लावून, बुद्ध वंदना झाली आणि तिथून आम्ही पुन्हा बस जवळ यायला निघालो. यानंतर एक अनपेक्षित वळण मिळाले, डिगेवाडी. आमच्या नियोजनात नसलेली, पण प्रवासानेच दाखवलेली लेणी. बस चुकून त्या मार्गावर गेली आणि स्थानिकांकडून 'घळ' असल्याचे समजले. चौकशी करून आम्ही वर पोहोचलो. स्थानिक मार्गदर्शकाने आम्हाला सुरक्षितपणे लेण्यांपर्यंत नेले. पण इथली परिस्थिती आणखी गंभीर होती. चैत्यगृह मातीने अर्धवट बुजवलेले, स्तूप त्यामध्ये गाडला गेला होता. स्तूपाच्या जागेवर पिंड बसवलेली, लादी टाकून मूळ रचना झाकलेली, दोन विहारांमध्ये माती भरलेली. चैत्यगृहामध्ये अलीकडच्या काळात लादी लावून धार्मिक कार्यक्रम सुरू केलेले. ही दृश्ये पाहताना जाणवत होते, आपण केवळ इतिहास विसरत नाही, तर त्याला बदलत आहोत. आम्ही तिथे पंधरा मिनिटे ध्यान केले. त्यानंतर आम्ही येराडवाडीच्या दिशेने निघालो. 210 पायऱ्या चढत, आम्ही वर पोहोचलो. धबधब्याच्या मागे लपलेली ती लेणी एक अप्रतिम दृश्य. मोठे चैत्यगृह, 21 खांब, वॉल्टेड छत आणि मध्यभागी असलेली जागा, जिथे कधीकाळी स्तूप होता. पण आता तिथे शिवलिंग बसवलेले होते. चैत्यगृह अर्ध्याहून अधिक मातीने बुजवलेले. निसर्ग, इतिहास आणि बदललेली ओळख या तिन्ही गोष्टींचा संगम इथे स्पष्ट दिसत होता. त्या लेणीतील शांतता, एक विचित्र पण खोल अनुभव देत होती. संध्याकाळचे पाच वाजले होते. आम्ही सर्वजण लेणीचा अभ्यास करून कधी कधी अस्तित्वात असलेला परंतु आज अस्तित्वात नसलेल्या स्तूपाला वंदन केले. तेथून आम्ही लेणीसमोर उभे राहिलो. आमचे बंधू प्रफुल्ल पुरळकर साहेब यांच्या मातोश्रींचे नुकतेच निधन झाले, त्यानिमित्त आम्ही त्यांना श्रद्धांजली म्हणून दोन मिनिटे शांत उभे राहून त्यांचे स्मरण करून भावपूर्वक श्रद्धांजली वाहिली. आमची अजून एक लेणी पाहायची इच्छा होती, तेथून 25 किलोमीटरवर एक अपरिचित लेणे आहे याची माहिती मिळाली होती, पण अंधार व्हायला सुरुवात झाली होती. त्यामुळे आम्ही परतीचा निर्णय घेतला. परतीच्या प्रवासात कोयना जलाशयाजवळ थांबलो. थोडा वेळ पाण्यात उतरलो, आम्ही सर्वजणांनी छान पैकी पाण्यात डुबकी मारली, आंघोळ केली. दिवसभराचा थकवा जणू वाहून गेला. नंतर पुन्हा परतीचा प्रवास सुरू झाला. नंतर एका हॉटेलवर थांबून सर्वांनी एकत्र जेवण केले आणि पुन्हा बसमध्ये बसलो. मी रात्रभर झोपूनच होतो. सकाळी पाच वाजता मी ऐरोलीला उतरलो, सकाळी मस्तपैकी चालत चालत घरी पोहोचलो. हा प्रवास फक्त लेण्यांचा नव्हता, हा प्रवास होता, आपल्या इतिहासाचा, आपल्या दुर्लक्षाचा आणि आपल्या जबाबदारीचा. आज एक गोष्ट मनात कोरली गेली, लेणी म्हणजे दगड नाहीत, त्या आपल्या अस्मितेच्या जिवंत साक्षी आहेत. त्यांना समजून घेणे, जपणे आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हीच आपली जबाबदारी आहे. बस एवढेच. ■ ■



विकी वामन येलवे
वकील, उच्च न्यायालय, मुंबई.

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १२२

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा धानोरा. जि. यवतमाळ**



धानोरा जिल्हा यवतमाळ शेतकरी आणि शेत.मजूर मोठ्या संख्येने राहतात. धानोरा परिसरातील अनेक गावे सहभागी होतात. विविध सांस्कृतिक आणि इतरही प्रबोधन विचार येथून प्रसारीत होतात. आजूबाजूच्या परिसरातील लोक येत असतात. बाबासाहेबांना वंदन करतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो. 9370773608

# गुलामगिरी विरोधी परिषदेत विचार जागवणारा व कृतीस प्रवृत्त करणारा संघर्षप्रधान सूर



**नागपूर :** हजारो वर्षापासून ब्राह्मणेतर समाज गुलामी मानसिकतेमध्ये वावरतो आहे. हा गुलामगिरीचा विळखा सोडवण्यासाठी गुलामी मानसिकता सोडल्याशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्ष सेक्युलरचे राज्य अध्यक्ष श्याम गायकवाड यांनी परखडपणे केले.

आम्ही सारे भारतीयच्या वतीने नुकतीच हिंदी मोरभवन येथे आयोजित गुलामगिरी विरुद्ध परिषदेत त्यांनी वरील विचार व्यक्त केले. परिषदेला संबोधित करताना ज्येष्ठ पत्रकार भूपेंद्र गणवीर यांनी लोकशाही बळकट करण्याचे आवाहन केले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या कॉम्रेड किरण मोघे यांनी आर्थिक व साम्राज्यवादी गुलामगिरीचे स्वरूप स्पष्ट केले. त्यांनी नोएडा येथे सुरू असलेल्या कामगारांच्या संघर्षाला पूर्ण समर्थन व्यक्त केले. ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत वानखेडे यांनी गुलामगिरीच्या मुक्तीमध्ये सद्यःस्थितीत आरएसएस हा मुख्य अडसर असल्याचे पूर्णपणे विशद केले.

परिषदेसमोर प्रस्ताव मांडताना अरुण लाटकर यांनी येत्या काळात अशा परिषदा जिल्ह्यात आयोजित करण्याचे आवाहन केले. परिषदेचे प्रास्ताविक करताना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सरदार जगजीत सिंग यांनी सध्या सुरू असलेल्या एस.आय.आर. प्रक्रियाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करून ती लोकशाहीला घातक असल्याचे सांगितले. परिषदेचे प्रास्ताविक करताना अशोक सरस्वती व डॉ. विनय बाराहाते यांनी सध्याच्या परिस्थितीत आंबेडकरवादी मार्क्सवादी, लोहियावादी, समाजवादी, गांधीवादी या सर्वांनी एकत्र येण्याची गरज प्रतिपादित केली. सामाजिक कार्यकर्ता सुरेंद्र बुराडे यांनी आभार प्रदर्शन केले. परिषदेची सुरुवात संविधानाच्या प्रास्ताविक वाचनाने तर समाप्ती राष्ट्रगीताने झाली. प्रा. घनश्याम धाबर्डे, श्याम काळे, अरुण लाटकर, डॉ. विनय बाराहाते यांनी अध्यक्ष मंडळाचे काम पाहिले.

# श्रीराम बनसोड यांना 'जीवनसंघर्ष' व 'समाजरत्न' पुरस्कार



**अमरावती :** अमरावती येथील अभिजीत बहुउद्देशिय सामाजिक विकास संस्था अंतर्गत 'एकता रॅली आयोजन समितीच्या वतीने 14 एप्रिल 2026 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते, लेखक श्रीराम बनसोड यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सभेत शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, राज्याचे माजी कृषीमंत्री हर्षवर्धन देशमुख यांनासुद्धा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अमरावतीचे खा. बळवंत वानखडे, खा. डॉ. अनिल बोंडे, आ. सुलभा खोडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी पालकमंत्री, खा. यशोमती ठाकूर, जेष्ठ पत्रकार आणि दैनिक विदर्भ मतदार या वृत्तपत्राचे संपादक दिलीप ऐडतकर, अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, माजी खा. अनंत गुढे, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, समितीचे आयोजक प्राचार्य गोपीचंद मेश्राम, किशोर बोरकर आणि अनेक दिग्गज मान्यवर विचारमंचावर उपस्थित होते. या प्रसंगी लोकमत (पुणे) चे संपादक, जेष्ठ पत्रकार संजय आवटे यांच्या घणाघाती भाषणाने उपस्थित हजारो लोक मंत्रमुग्ध झाले. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदयीकरण समिती अमरावती तर्फे आयोजित जयंतीच्या भव्य सभेत श्रीराम बनसोड यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनसंघर्ष या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वरील दोन्ही कार्यक्रम डॉ. आंबेडकर (इर्विन) चौकात हजारो लोकांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या चौकात अनेक संघटनाचे जेवणाचे स्टॉल, पुस्तकांचे स्टॉल लागले होते. अमरावती येथील भिमटेकडीवर आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेण्यास रात्रीसुद्धा आंबेडकरी जनसागर लोटला होता. भीमटेकडीच्या मनमोहक सौंदर्यीकरणातून निर्मित प्रेक्षणीय बुद्ध-आंबेडकरांची भूमी पाहण्यास दूरदुरून आंबेडकर अनुयायी येत होते. श्रीराम बनसोड यांना 31 जानेवारी 2026 रोजी दिघोरी, नागपूर येथे आयोजित दुसऱ्या परिवर्तन साहित्य संमेलनात पंडित रेवाराम कवाडे या पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांच्या पुढील वाटचालीस आणि समाज कार्यासाठी मंगलमय शुभेच्छा!

## महत्वाचे

## डॉ. प्रविण गांगुर्डे यांना 'समाजभूषण पुरस्कार'



**नाशिक :** प्रज्ञा प्रबोधिनी सामाजिक संस्था यांच्या वतीने 18 एप्रिल 2025 रोजी डॉ. प्रविण मंदाकिनी शांताराम गांगुर्डे यांना 'समाजभूषण पुरस्कार' प्रदान केला. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मानसिक आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच ग्रामीण भागातील सेवाभावी योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. पुरस्कार प्रदान सोहळ्यात संस्थेचे अध्यक्ष किशोर जाधव, सेक्रेटरी शेखर डावरे व खजिनदार देविदास वाघ यांच्या उपस्थितीत डॉ. गांगुर्डे यांचा सन्मान केला.

## सर्वोदय आश्रम पुरस्कार सोहळा



**नागपूर :** माजी कुलगुरू, कृषी विद्यापीठाचे डॉ. शरद निंबाळकर यांनी आजच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना निराशेची भावना व्यक्त केली, मात्र भविष्यासाठी आशेचा किरण निर्माण करण्याचे आवाहन केले. पुरस्कारप्राप्त मान्यवरांनीही आपल्या मनोगतात सामाजिक कर्तव्याची जाणीव प्रथम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी डॉ. मनोज नरांजे यांनी आपल्या मनोगतात शिक्षकांच्या भूमिकेवर भाष्य करताना सांगितले की, शिक्षकांनीच त्यांच्या जीवनाला दिशा दिली. सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत प्राथमिक स्तरावर दबावाखाली शिक्षण द्यावे लागत असून शिक्षकांवरील समाजाचा विश्वास कमी होत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांपर्यंत मानवी मूल्यांचे शिक्षण पोहोचवले तर संस्कारित युवापिढी घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आर्वी येथे 'साहित्य संवाद'



**आर्वी :** कन्नमवार नगर येथील सिद्धार्थ सार्वजनिक वाचनालय येथे संयुक्त जयंती निमित्त साहित्य संवाद व पालीभाषा परीक्षा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. विविध साहित्यिक, कवी, समीक्षक व सामाजिक कार्यकर्त्यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती.कार्यक्रमात कवितासंग्रह, गझलसंग्रह, लेखसंग्रह आणि स्वकथन अशा विविध साहित्यकृतींवर अभ्यासपूर्ण चर्चा करण्यात आली. स्त्री जीवनावर आधारित कविता सादरीकरणासह साहित्यिकांनी आपल्या विचारांनी कार्यक्रम समृद्ध केला. कार्यक्रमाच्या समारोपावेळी सहभागी कवी व साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला. तसेच प्रबोधन, साहित्यनिर्मिती आणि सांस्कृतिक जतन यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन, स्वागत, तसेच अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थितांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## समता वॉकथॉन मधून महात्मा जोतिबा फुलेंच्या विचारांचा प्रचार



**नागपूर :** तथागत संथार, इंद्रप्रस्थ नगर येथे भारतीय बौद्ध परिषद शाखा भामटी येथील स्त्रियांनी समता वॉकथॉन मधून महात्मा जोतिबा फुले अणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रचार केला. यामधे सोनेगाव, अमर आशा ले-आऊट, वहाणे ले-आऊट, पन्नासे ले-आऊट, पाटील ले-आऊट, फुरसुंगी ले-आऊट, मनीष ले-आऊट, एच.बी.इस्टेट, पॅराडाईज सोसायटी येथील सावित्रीच्या लेकीने भाग घेतला. तसेच शाखेचे अध्यक्ष आणि ईतर पदाधिकारी उपस्थित होते.

## आजचे कार्यक्रम

**महाराष्ट्र ऑफिसर्स फोरम (म.रा.) नागपूर**

तारीख : शनिवार १८/०४/२०२६
वेळ :- सायं. ५.३० वाजता
स्थान:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, कॉन्फरन्स हॉल, उरुवेला कॉलनी, नागपूर

# राजर्षीनगर येथे अभिवादन गीतांची मैफल



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संयुक्त जयंती उत्सव समिती आणि धम्मसंगिनी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निरंजना बुद्धविहार, राजर्षीनगर येथे सकाळी सहा वाजता अभिवादनपर बुद्ध भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरवात अरूण पेटकर यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहणाने झाली. यानंतर उपस्थित प्रमुख अतिथी तसेच समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भ. बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह विहारातील महापुरुषांच्या प्रतिमांना माल्यार्पण केले. यानंतर आचार्य महानागरत्न यांच्या हस्ते बुद्धवंदना घेण्यात आली. बुद्ध वंदनेनंतर अनिल भगत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या अभिवादनपर बुद्ध - भीम गीत गायनाला सुरवात केली. 'ओम नमो तथागता' या सुगम गीत प्रकारातील अभिवादन गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाल्याने वातावरण भारावून गेले. उपस्थित रसिक एक वेगळी अनुभूती घेत आहेत याचा प्रत्यय येत होता. कारण सकाळी सहा वाजता तयारी करून कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा वेगळा अनुभव गाठीशी बांधल्या जात होता. उपरोक्त गीताने सुरू झालेली ही अभिवादन पर गीतांची संगीत मैफिल उत्तरोत्तर अधिक रंगत गेली. रसिकांची दाद, गीतांची उजळणी, त्यामधील आशय, गंभीरतेने रसिक भारावून जात होते आणि कलावंतांना उत्स्फूर्त अशी दाद देत होते. अनिल भगत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लोकसंगीत आणि सुगम संगीत बाजाची गीत निवडल्याने एक मिश्र अनुभव प्राप्त होत असल्याचा भाव रसिकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. 'भीमा ये पुन्हा...,' 'शिल्पकार जीवनाचा...' 'नमस्कार घ्यावा..' मन्नाडे यांनी गायलेल अंगुलीमाल चित्रपटातील 'घबराये जब मन अनमोल..' अशी एकाहून एक सरस गीत कलावंतांनी गायन करून रसिकांना प्रभावित केले. या संगीत मैफिलीचा समारोप सुरेश भट यांनी रचलेल्या 'भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना..' या गीताने झाला. या मैफिलीत अनिल भगत यांच्यासह अर्चना पाटील, संध्या साळवे, पल्लवी खोंडे, श्रीकांत भेंडे, आर्यन डोंगरे या गायक कलावंतांनी गीत सादर केलीत तर त्यांना साथ संगत अनिल भगत (सिंथेसायजर), प्रदीप गजभिये (ऑक्टोपॅड) आणि सुरेश हिवराळे (ढोलकी) या कलावंतांची लाभली होती. ध्वनी व्यवस्था अनिल सवाईथुल यांनी सांभाळली. कार्यक्रमाची संकल्पना अनिरुद्ध कांबळे यांची होती तर संचालन दामोदर लोखंडे आणि अनिरुद्ध कांबळे यांनी केले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीच्या पदाधिकारी मीना गाडे (अध्यक्ष), लतिका ओंकार (सचिव), ज्योती फुलकर (कोषाध्यक्ष), पौर्णिमा मानकर (उपाध्यक्ष), संघपाल शंभरकर (सहसचिव) यांच्यासह ॲड. अशोक खडतकर, निलिमा भगत, नम्रता बोरकर, वंदना गोटे, प्रियदर्शिनी गजभिये, वैशाली रामटेके, विनीत ओंकार, गौतम फुलकर त्याच बरोबर अन्य सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. एक आगळा अनुभव घेतल्याचा उपस्थित रसिकांच्या प्रतिक्रिया कार्यक्रमाच्या सफलतेची ग्वाही देणाऱ्या होत्या.

# आंबेडकरी कविता समष्टीला मूल्यभान देणारी : प्रशांत वंजारे



**वाशिम :** प्रज्ञा साहित्य संघाद्वारे आयोजित आंबेडकरी साहित्य संमेलनात पार पडलेल्या परिसंवादात आंबेडकरी कवितेच्या सामाजिक व सांस्कृतिक भूमिकेवर सखोल विचारमंथन करण्यात आले. या प्रसंगी समिक्षक प्रशांत वंजारे यांनी 'आंबेडकरी कविता समष्टीला मूल्यभान देणारी आहे' असे प्रतिपादन केले. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या पर्यायी संस्कृतीवर आधारित साहित्य माणसाला मूल्यवान जीवनाची दिशा देते आणि व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनावर सकारात्मक परिणाम घडवते. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी शेषराव धांडे होते. त्यांनी आंबेडकरी कविता ही चळवळीचा आरसा असून कवींनी चळवळीचे शब्दांकन करण्याचे ऐतिहासिक कार्य केल्याचे सांगितले. यावेळी महेंद्र ताजणे आणि संजय घरडे यांनीही विषयास अनुसरून आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन दिपक ढोले यांनी केले, तर आभारप्रदर्शन शालिक वानखडे यांनी केले. परिसंवादाचे संयोजन अनिल कांबळे व गना कांबळे यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायकांना बोलके केले : प्रा. ज्योतिक ढाले



**नागपूर :** दहीपुरा, उंटखाना येथील भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई उद्यानात वंदना समूहाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. ज्योतिक ढाले यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनूप्रणित व्यवस्थेतून मूकनायकांना बोलके केले' असे प्रतिपादन केले. त्यांनी समताधिष्ठित समाज निर्माणासाठी डॉ. आंबेडकरांनी संविधान आणि बौद्ध धम्माच्या माध्यमातून केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. केशव मेंढे होते. त्यांनी संविधानातील आरक्षण व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक खंडाळे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय ॲड. सतीश जीवने यांनी करून दिला. संचालन सिद्धार्थ कांबळे यांनी केले, तर आभार इंजि. पृथ्वीराज डोईफोडे यांनी मानले. कार्यक्रमात वंदना समूहाच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जयंती साजरी केली.

# विविध संस्था संघटनांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी !

## दिक्षितनगर, नागपूर



**नागपूर :** दिक्षित नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. या प्रसंगी मिलिंद चहांदे (प्रबंधक जनसंपर्क, WCL) यांनी प्रबोधनात्मक भाषण करत डॉ. बाबासाहेबांच्या बालपणापासून ते बडोदा येथील संघर्ष, त्यांच्या शैक्षणिक कर्तृत्व व संविधान निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला.

डीजे व लेझीम पथकासह कपील नगर बुद्ध विहारापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. 'संविधान जागर' हे पथनाट्य कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत नरेश मेश्राम यांनी केले, परिचय प्रमोद चौधरी यांनी करून दिला. अध्यक्ष बांबोर्डे यांचे स्वागत बावणगडे यांनी केले. समिती अध्यक्षा संगीता पाटणकर यांचे स्वागत रंजना डबरासे, सुषमा पाटील व अनुजा रामटेके यांनी केले. दिक्षित नगरात नव्याने आलेल्यांचे स्वागत संजिव वानखेडे व इतर मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रांजय पाटील यांनी केले, त्यांना वंदना बहादुरे व पुनम गजभिये यांनी साथ दिली. आभार प्रदर्शन डॉ. सुदामे यांनी केले.



## नागपूर जिल्हा वकील संघटना

**नागपूर :** जिल्हा वकील संघटना, नागपूर येथे 14 एप्रिल 2026 रोजी जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात न्यायालयीन अधिकारी, विधी प्राधिकरणाचे प्रतिनिधी तसेच वकील संघटनेचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी महान विभूतींच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या सामाजिक न्याय, समता व राष्ट्रनिर्मितीतील योगदानाला अभिवादन केले.

## महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ



**नागपूर :** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) तर्फे कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. शिरीष उपाध्ये, डॉ. नितीन कुरकुरे, डॉ. सचिन बोन्डे, डॉ. भूषण रामटेके, मनिषा शेंडे, ईंजि. प्रमोद तायडे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच डॉ. जयंत कोरडे, डॉ. नरेश नंदेश्वर, डॉ. अजय गावंडे, डॉ. वकार खान, डॉ. अतुल ढोक, डॉ. संजय गोडबोले, दिनेश पाटील, डॉ. गिरीधर शेंडे, डॉ. महेश जावळे, डॉ. प्रज्ञेय ताकसांडे, डॉ. गीतांजली ढुमे, रामराव किर्तने, अजय खुटाटे, निरज कुरळकर, जालिंदर गजभारे, प्रवीण बागडे, जितेंद्र हातमोडे व संतोष बनसोड यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठातील विविध विभागांमध्येही डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक समता, न्याय व शिक्षणाच्या विचारांचा गौरव केला.

## ब्ल्यू क्लब, नागपूर



**नागपूर :** ब्ल्यू क्लब सोशल फोरमच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात महात्मा ज्योतिबा फुले द्विशताब्दी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर 135 वी जयंती, महाड मुक्ती संग्राम व बहिष्कृत भारत वृत्तपत्र शताब्दी निमित्त संयुक्त समारोह उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमांना माल्यार्पणाने झाली. विनायक हाडके यांनी सामूहिक बुद्ध वंदना घेतली. अध्यक्ष विद्याधर सोनटक्के व विनायक हाडके यांनी प्रमुख अतिथी डॉ. पुरण मेश्राम यांचा सत्कार केला.

प्रास्ताविक अविनाश कठाणे यांनी केले. प्रमुख वक्ते डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांनी महाड मुक्ती संग्राम व 'बहिष्कृत भारत'च्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी घडवलेल्या सामाजिक क्रांतीवर भाष्य केले. यानंतर सुनील रंगारी व विलास डुले यांनी भीमगीत व बुद्धगीत सादर केले. आभार सुनील पाटील यांनी मानले, तर संचालन महेंद्र जीवने यांनी केले. कार्यक्रमात अरविंद थुल, गौतम मोडक, सुनील वाकोडे, अनिल भांगे, सुरेंद्र चांदेवाल, विलास डुले, दिलीप मेश्राम, किशोर नगराळे, आनंद मानकर, सुधाकर लोखंडे, यशवंत वासनिक, प्रकाश पाटील, प्रदीप धनवीज, ॲड. विद्यासागर गवळी, रंजन मेंढे, हिरामण वाघमारे, सुधीर चालखुरे, राजेश लोखंडे व राजेश हाडके यांच्यासह पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## समुहघोष सामाजिक संस्था

**नागपूर :** समुहघोष सामाजिक संस्था व समुहघोष मैत्री परिवार तर्फे कर्मवीर बाबु हरीदासजी आवळे स्मृती परिसर, आवळे बाबु चौक (कमाल चौक) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती उत्साहात साजरी केली.

रात्री 12 वाजता आतषबाजी व केक कापून जयंतीची सुरुवात करण्यात आली. तसेच मुख्य चौकात 10×56 फूट बॅनर लावून सामाजिक संदेश दिला. भदंत नागदिपांकर महाथेरो यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर अल्पोपहार व मिठाई वाटप करण्यात आले. या प्रसंगी उमेश बोरकर, राजकुमार मेश्राम, राकेश खोब्रागडे, नरेश वाहणे, सुरेश पाटील, संपत वंजारी, संजय फुलझेले, संजय सोमकुंवर, अशोक नगरारे, पुष्पराज तिडके, शंकरराव ढेंगरे, मनोहर गायकवाड, बाळुमामा कोसमकर, विरेंद्र मंडपे, क्रिष्णा बुरडे, दर्शन साहारे, प्रदिप वागदे, भगवान गजभिये, ईश्वर सुर्यवंशी, सुनिल शेंडे, विलास नितनवरे, जयप्रकाश भिवगडे, चंदु गोटे, कमलेश लोखंडे, रवी पाटील व राजेश नानवटकर, पाटील यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दवलामेटी वाडी



**दवलामेटी वाडी :** सम्राट अशोक नगर बौद्ध उपासक संघाच्या वतीने 135 व्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दवलामेटी वाडी येथे तीन दिवसीय महोत्सव उत्साहात साजरा केला. अध्यक्ष बी. एल. मेश्राम यांनी धम्म ध्वजारोहण केले. प्रमुख अतिथींच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले, तर एन. के. बागडे यांनी सामूहिक बुद्ध वंदना घेतली. कार्यक्रमाला सेवानिवृत्त सहाय्यक महाप्रबंधक सुभाष बोंदाडे, समता सैनिक दल हिंगणा शाखा संयोजक विलास झाडे, स्तूप बांधकाम ठेकेदार धनराज बागडे, संघमित्रा महिला मंडळ अध्यक्षा शोभा कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर निनावे, गजू गजभिये, बाळू ढोके उपस्थित होते. प्रमुख वक्ते सुभाष बोंदाडे यांनी युवकांनी संघटित होऊन आंबेडकर चळवळ बळकट करण्याचे आवाहन केले. यावेळी प्रबोधनकार मनोज निकाळजे यांनी 'भीम गर्जना' हा संगीतमय कार्यक्रम सादर केला. महिला, मुले व मुलींसाठी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा व विविध स्पर्धा घेऊन बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डी.डी. गजभिये यांनी केले, तर आभार धीरज सोमकुवर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रत्नकुमार रंगारी, मनीष वाहने, शैलेश खोब्रागडे, उमेश थोरात, गौतम गजभिये, देवेंद्र बनसोड, वैभव तिरपुडे, शीतल वासनिक, शिल्पा खोब्रागडे, आरती मेश्रम, भाग्यश्री वाहने, शुभांगी वासनिक, मनिषा खोब्रागडे, कल्पना बोरकर, सुमन पाटील, अंतकाला घोडेस्वार, मेघा मेश्राम, मयंक थूल यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते


बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648